संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in
मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २७३ * * अमरावती * रविवार, दिनांक ३० मार्च २०२५ ८ पाने • किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

प्रत्येक प्रकरणात वाद कशाला?

'वाघ्या' कुत्र्याच्या शिल्पावरून फडणवीसांनी सुनावले....

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :
वाघ्या कुत्र्या संदभार्तील स्मृती स्थळावरून सगळ्यांशी चर्चा करावी लागणार आहे. त्यासाठी होळकर यांनी पैसे दिले आहेत, हे सर्वांना माहिती आहे. त्यामुळे या प्रकरणात सर्वांशी चर्चा करून, वाद न करता मार्ग निघू शकतो. प्रत्येक गोष्ट वाद केलाच पाहिजे का? तर असे काही नसल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांनी आज तुळजापूर आणि पंढरपूर येथील मंदिर परिसरात सुरु असलेल्या कामांची पाहणी केली. या वेळी ते प्रसार माध्यमांशी बोलत होते.
वाघ्या कुत्र्या संदभार्तील स्मृती स्थळावरून वाद निर्माण करून काहीही होणार नाही. धनगर समाज एकीकडे आणि मराठा समाज एकिकडे हे कशासाठी? हे अतिशय अयोग्य आहे. या विषयावर बसून मार्ग काढता येईल, असे देखील देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

या संदर्भात बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संभाजी महाराज यांना अनेक वेळा भेटण्याची वेळ दिली आहे. ते माज्याशी फोनवर देखील बोलतात. ते मला येऊन देखील भेटतात. त्यामुळे त्यांना वेळ न देण्याचे काहीही कारण नसल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.
वाघ्या कुत्र्याच्या स्मृती स्थळावरून युवराज संभाजीराजे यांनी देवेंद्र फडणवीस यांना भेटण्याची वेळ मागितली असून त्यांची वेळ मिळाली नसल्याचे म्हटले होते. मात्र ते मला कधीही भेटू शकतात, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी त्यांचा दावा फेटाळला आहे.

१६ नक्षलवाद्यांना कंठस्नान

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २९ :
छत्तीसगडमधील सुकमा जिल्ह्यातील केरलापालच्या जंगल परिसरात सुरु असलेल्या चकमकीत १६ नक्षलवाद्यांना ठार करण्यात सुरक्षा दलाला यश आले आहे. आज, सकाळी ८ वाजतापासून ही चकमक सुरु होती. मृत नक्षलवाद्यांची संख्या वाढू शकते, अशी शक्यता छत्तीसगड पोलिसांनी वर्तवली आहे.
जिल्ह्याच्या केरलापाल जंगल परिसरात मोठ्या संख्येने नक्षलवादी एकत्र आल्याची गोपनीय माहिती सुरक्षा दलाला मिळाली होती. यावरून सुकमा पोलीस दलाचे डीआरजी पथक आणि बिजापूर जवानांनी २८ मार्च रोजी रात्रीच्या सुमारास संयुक्तपणे नक्षलविरोधी अभियान राबविले होते. दरम्यान, २९ मार्चला सकाळी ८ वाजताच्या सुमारास पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक उडाली.
यावेळी दोन्ही बाजूने मोठ्या प्रमाणात गोळीबार करण्यात आला. यात १६ नक्षलवादी ठार झाले. तर दोन डीआरजी जवान जखमी झाल्याची माहिती आहे.

पीएम मोदींचा दौरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २९ :
पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी सकाळी नागपूर दौऱ्यावर येत आहेत. सकाळी ९ ते दुपारी १ वाजतापर्यंत ते नागपुरात असतील.

पोलिसांनी घेतला व्यवस्थेचा आढावा उड्डाणपूल बंद

त्यांच्या दौऱ्यानिमित्त कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, शनिवारी शहर वाहतूक पोलिसांनी विविध मार्गांवर वाहतूक व्यवस्थेची तपासणी केली. या दरम्यान सदर आणि सीताबर्डी उड्डाणपूल बंद ठेवून रविवारी येणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यात आला. या दरम्यान अचानक उड्डाणपूल बंद करण्यात आल्याने नागरिकांना काही चौकांमध्ये वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.
जाणकारांच्या मते, रविवारी वर्धा रोडसह शहरातील रस्त्यांवर सामान्यतः वाहनांची संख्या कमी असते. त्यामुळे मोदींचे आगमन ते आरएसएस मुख्यालय, दीक्षाभूमी भेट व माधव नेत्रालयाच्या कार्यक्रमात सामील होतपर्यंत नागरिकांना खूप अधिक अडचणींचा सामना करावा लागणार नाही.
शनिवारी वाहतूक विभागाकडून पंतप्रधानांच्या दौऱ्याच्या वेळी वाहतूक व्यवस्था कशी असेल याची रंगीत तालीम घेण्यात आली. यावेळी बर्डी, आरबीआय चौक, वर्धा रोड, बैद्यनाथ चौक येथे वाहनांच्या रांगा लागल्या. पंतप्रधानांच्या सुरक्षा कारणास्तव काही मार्ग तात्पुरते बंद केल्याने पर्यायी रस्त्यांवर वाहतूक वाढली व जामची स्थिती निर्माण झाली. शहरातील सर्वात व्यस्त भागांपैकी एक बर्डी चौकात वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागला. आरबीआय चौकातही जाम लागल्याने प्रवाशांना गंतव्यावर वेळेत पोहोचता आले नाही.
बैरिकेडिंग व पर्यायी मार्ग
पंतप्रधान मोदी विमानतळावरून थेट आरएसएस मुख्यालयात जातील. त्यांचा ताफा वर्धा रोड, रहाटे चौक, काँग्रेसनगरमार्गे महालकडे जाईल. पोलिसांनी शनिवारपासूनच अनेक ठिकाणी बैरिकेड्स लावले आहेत.

बळीसंख्या १ हजारापेक्षा अधिक

■ वृत्तसंस्था, नायपिडॉ, दि. २९ :
शुक्रवारी झालेल्या ७.७ रिश्टर स्केल तीव्रतेच्या भूकंपानंतर म्यानमारमध्ये मोठ्या प्रमाणात विध्वंस झाला आहे. मृतांचा आकडा १० हजारांपेक्षा जास्त असू शकतो. ही भीती युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सव्हने व्यक्त केली आहे. भूकंपाचे धक्के थायलंड, बांगलादेश, चीन आणि भारतापर्यंत जाणवले.
म्यानमारच्या लष्करी सरकारने मृतांची संख्या १,००२ वर पोहोचल्याचे म्हटले आहे, तर २,४०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. दुसरीकडे, थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये एक ३० मजली इमारत कोसळली आहे. यामध्ये १० जणांचा मृत्यू झाला आहे.
शुक्रवारी सकाळी ११:५० वाजता म्यानमारमध्ये ७.७ तीव्रतेचा भूकंप झाला. म्यानमार आणि थायलंडमध्ये गेल्या २०० वर्षांतील हा सर्वात मोठा भूकंप आहे. मोठ्या प्रमाणात झालेल्या विध्वंसामुळे म्यानमारच्या ६ राज्यांमध्ये आणि संपूर्ण थायलंडमध्ये आणीबाणी लागू करण्यात आली आहे. शनिवारी दुपारी म्यानमारमध्ये पुन्हा भूकंपाचा धक्का बसला. भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ५.१ मोजण्यात आली.

संयुक्त राष्ट्रांकडून ४३ कोटी रुपयांची मदत

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २९ :
भूकंपानंतर, भारताने १५ टन मदत साहित्य आणि ८० एनडीआरएफ बचाव कर्मचाऱ्यांची टीम म्यानमारला पाठवली आहे. त्याला 'ऑपरेशन ब्रह्मा' असे नाव देण्यात आले आहे. त्याच वेळी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्यानमार पीपल्स गव्हर्नमेंटचे प्रमुख जनरल मिन आंग ह्लाईंग यांच्याशी चर्चा केली.
पंतप्रधान म्हणाले की, जवळचा मित्र आणि शेजारी म्हणून भारत या कठीण काळात म्यानमारच्या जनतेसोबत खंबीरपणे उभा आहे.
संयुक्त राष्ट्रांनी म्यानमारला मदत कार्यक्रम सुरू करण्यासाठी ५ दशलक्ष डॉलर्स (४३ कोटी रुपये) दिले. रशियाच्या आपत्कालीन मंत्रालयाने १२० बचाव कर्मचारी आणि आवश्यक साहित्य घेऊन दोन विमाने पाठवली. चिनी बचाव पथक प्रथम पोहोचले. हाँगकाँग, सिंगापूर आणि मलेशिया देखील बचाव पथके पाठवतील.

२ तासात पालकमंत्र्यासमोर ६०० तक्रारींचा ढीग

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि.२९ : जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे शुक्रवारी (दि.२८) शहरात होते. त्यांनी नियोजन भवनमध्ये सर्वसामान्यांसाठी जनसंवादचे आयोजन केले होते. यावेळी अवघ्या दोन तासात जिल्हाभरातून आलेल्या नागरिकांनी तब्बल सहाशे तक्रारीवजा निवेदन न्याय मिळण्याच्या अपेक्षेने पालकमंत्र्यांना दिले आहे. यावरुन शासकिय यंत्रणेमध्ये जेनतेच्या तक्रारींना सहजासहजी न्याय मिळत नसल्याचे पालकमंत्र्यांकडे पोहचलेल्या निवेदनाच्या संख्येवरुन समोर येत आहे. दरम्यान आज ज्यांनी निवेदन दिलेले आहेत, त्यांच्या निवेदनावर झालेल्या कारवाईबाबत संबधित नागरिकाला आठ दिवसात माहीती मिळणार आहे.

नागरिकांच्या प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी पालकमंत्र्यांनी शुक्रवारी नियोजन भवनात जनसंवादचे आयोजन केले होते. यासाठी दुपारी एक ते तीन ही नियोजित वेळ होती. त्यासाठी जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून नागरिक उन्हा-तान्हातन्यायाच्या अपेक्षेने पोहचले होते. नियोजन भवनात चिक्कार गर्दी झाल्यामुळे शेकडो नागरिकांना नियोजन भवनाच्या खाली कापडी मंडपात थांबवण्यात आले होते. जनसंवादमध्ये जवळपास सहाशे तक्रार, निवेदन पालकमंत्री यांना प्राप्त झाले आहेत. या सर्व निवेदनांची विभागनिहाय वर्गवारी करुन सोमवारी संबधित विभागांकडे पाठविण्यात येणार आहे.

निवेदनावर होणाऱ्या कारवाईबाबत संबधितांना आठ दिवसात नियोजन भवन ईमारतीत असलेल्या पालकमंत्री कार्यालयात माहीती मिळेल.

अनिल भटकर, निवासी उपजिल्हाधिकारी

अनेक विभागाचे अधिकारी चार तास नियोजन भवनात जनसंवाद कार्यक्रमाला कोणत्याही विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित नव्हते. जसे जिल्हाधिकारी, मुख्य कार्यपालन अधिकारी, मनपा आयुक्त. यावेळी कनिष्ठ अधिकारी हजर होते. मात्र पालकमंत्र्यांनी एक, दोन प्रकरण वगळता इतर कोणत्याही तक्रारींवरून संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली नाही. यावेळी अनेक अधिकारी नियोजन भवनमध्ये चार तास थक्क बसून होते. वास्तविकता आज या आठवड्यातील शेवटचा वर्कींग डे होता. आता थेट मंगळवारी शासकिय कार्यालय सुरू होतील.

त्यामुळे आज कार्यालयांमध्ये नागरीक कामांसाठी गेले तर साहेब पालकमंत्री साहेबांच्या बैठकीसाठी गेले आहेत, असे उत्तर सर्वसामान्यांना काही शासकिय कार्यालयांमध्ये गेल्यानंतर मिळाले.

नवीन आर्थिक धोरणांचे ग्रामीण कृषक समाजावर भीषण परिणाम : डॉ. प्रदीप मेश्राम

विद्यापीठात पंधरावे राज्यस्तरीय अधिवेशनाचे दुसरे सत्र संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि.२९ : नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार करून आज तीस पेक्षा जास्त वर्षे झालीत. ग्रामीण कृषक समाजावर अलीकडे त्याचे भीषण परिणाम दिसून आले आहेत. शेतीतील वाढता खर्च, घटते उत्पन्न, पर्यावरणीय प्रश्नांमुळे निसर्गाचा ढासाळलेला समतोल, वाढत्या शेतकरी आत्महत्या, शेतमालाला भाव नसणे, कृषक स्त्रियांच्या वाढत्या समस्या, भौतिक सुविधांच्या अभावांची भीषणता अशा अनेक कारणांमुळे ग्रामीण कृषक समाज संकटात सापडलेला आहे. शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही ग्रामीण भागात असणारी हलाखीची परिस्थिती कृषक जीवनात अनेक संकटे निर्माण करणारी आहे. समाजातील रूढीवादी धारणा, जातिव्यवस्था यांमुळेही कृषक समाजातील प्रश्न बिकट बनले आहेत. यावर उपाय म्हणून समाजशास्त्रातील अभ्यासक आणि संशोधकांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरेल, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातील समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष आणि सत्राचे प्रमुख वक्ते डॉ. प्रदीप मेश्राम यांनी व्यक्त केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील समाजशास्त्र विभाग आणि विदर्भ मराठी समाजशास्त्र परिषद, ब्रह्मपुरी, जि. चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन आर्थिक धोरणाचा ग्रामीण कृषक समाजावर पडलेला प्रभाव या विषयावर दोनदिवसीय पंधराव्या राज्य अधिवेशनाचे दुसरे सत्र संपन्न झाले. यावेळी विचारमंचावर अध्यक्षस्थानी वर्धा येथील प्रियदर्शनी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. धनंजय सोनटक्के, विषयतज्ज्ञ म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठातील समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. अशोक बोरकर उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. धनंजय सोनटक्के यांनी नवीन आर्थिक धोरणांच्या पार्श्वभूमीचा वेध घेऊन ग्रामीण जीवनात खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण यांमुळे निर्माण झालेल्या सामाजिक प्रश्नांचा वेध घेतला. या सामाजिक प्रश्नांमधील कृषक समाजातील ढासळत असलेल्या परिस्थितीचा वेध घेतला. कृषक समाजातील वाढता कर्जबाजारीपणा, असहायता याकडे त्यांनी लक्ष वेधले. डॉ. अशोक बोरकर यांनी समाजशास्त्राच्या सैद्धांतिक चौकटीतून ग्रामीण कृषक समाजातील बदलांचा वेध घेतला. नवीन आर्थिक धोरणाची व्यापकता आणि त्याचे दूरगामी परिणामांच्या चौकटीत त्यांनी ग्रामीण कृषक समाजातील विविध घटकांवरील परिणामांवर मौलिक चर्चा केली. विविध सामाजिक समस्यांमधील आंतरसंबंधांचा वेध घेऊन ग्रामीण कृषक समाजातील दारिद्र्य, ताणतणाव आणि सामाजिक विषमतांच्या सुरु असणाऱ्या पुनरुत्पादानाकडे लक्ष वेधले. नवीन आर्थिक धोरणाचे अर्थ-राजकीय प्रक्रिया आणि तिचा भारतीय समाज जीवनावरील परिणामांकडे लक्ष वेधून प्रामुख्याने ग्रामीण कृषक समाजातील वाढती अभावग्रस्तता, ताणतणाव आणि शोषण अशा विविध पैलूंवर या सत्रात चर्चा घडून आली.

सूत्रसंचालन श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावतीच्या समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुनिता धोपटे यांनी, तर आभारप्रदर्शन श्री तुळशीरामजी जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, वाशिमचे समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. पद्मानंद तायडे यांनी केले.

यावेळी प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डीपीटीच्या कूर्मगतीने दिव्यांगांवर उपासमारी

आंदोलन करण्याचा निवेदनातून इशारा

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि.२९ : डीपीटीच्या कूर्मगतीमुळे केवायसी होत नसल्याने संजय गांधी, श्रावण बाळ, इंदिरा गांधी योजनेच्या ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग लाभार्थींवर सध्या उपासमारीची वेळ आली आहे. कारण, केवायसी अभावी त्यांच्या खात्यात दरमहा १५०० रु.ची रक्कमच जमा होईनाशी झाली आहे. अमरावती शहरात ५५ हजार संजय गांधी योजना श्रावणबाळ योजना इंदिरा गांधी योजनेअंतर्गत लाभ घेणारे लाभार्थी आहेत. मात्र, आठवडाभरात अमरावती तहसीलमध्ये केवळ लोकांची डीपीटी होत आहे. मनुष्यबळ नसल्यामुळे ५० डीपीटी होत आहेत. यासाठीही त्या लोकांना वारंवार चकरा मारत व रांगेत तासन्तास उभे राहवे लागत आहे. तरी ही त्यांचे काम होत नाही व रांगेतून नंबर लागला तरी हा दस्तावेज नाही, तो दस्तावेज नाही, तुमची केवायसीच झाली नाही, असे सांगून त्याला परत पाठवले जात आहे. त्यांना वारंवार चकरा मारायला लावतात. काही लोकांचे अंगठे येत नाही त्यामुळे त्यांची केवायसी होत नाही व आधार कार्ड पण त्यांचे अपडेट होत नाही. अशा प्रकारामुळे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग हवालदील झाले आहेत. ते केवळ या कार्यालयातून त्या कार्यालयात, बँकेत, एचडीओ, जिल्हाधिकारी कार्यालयात फिरत आहेत. कर्मचारी त्यांना सांगतात आमच्या हाती काही नाही. आता सगळं सरकारच्या हाती आहे.तुमचे कागद तहसील मध्ये दिले तर आम्ही सगळं करू शकतो, नाहीतर आमच्या हाती काही नाही. ज्या लाभार्थ्यांची डीपीटी मध्ये एन्ट्री झालेली आहे त्यांच्या बँक खात्यात एक ते दोन महिन्यांपासून पैसे आलेले नाहीत.

न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे शिवसेना ठाकरे गटाचे नेते प्रवीण हरमकर, उपशहर प्रमुख पंजाबराव तायवाडे, गोविंदा दायमा, विभाग प्रमुख मनीष रामावत, प्रभाग प्रमुख विनोद शर्मा, प्रभाग प्रमुख राजू हेरे, आनंद राठी विजय बेनोडकर, प्रमोद वानखडे, कमलेश गुप्ता, संदीप मानेकर, रुपेश वालेकर, निकेश शर्मा, अजीम लाला, आशुतोष सावरकर, श्रीकांत शर्मा यांच्यासह आदींनी निवेदनाद्वारे केली.

संस्कृती संवर्धन समितीतर्फे स्वागतयात्रा

मार्गातील मंदिरांना ध्वज प्रदान करण्यात येणार

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. २९ : शहरात संस्कृती संवर्धन समितीच्या वतीने नगराचे आराध्य दैवत श्री राज राजेश्वर मंदिरातून चैत्र शुक्ल १, प्रतिपदा शके १४०४७ अर्थात गुढीपाडवा रविवारी, मार्चला सकाळी वाजता हिंदू नववर्षाचे स्वागत करण्याकरिता स्वागत यात्रेचे आयोजन केले आहे. आर्य समाज मंदिर येथील सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत संस्कृती संवर्धन समितीचे अध्यक्ष प्रा.नितीन बाठे यांनी याबाबत माहिती देत या स्वागत यात्रेचा प्रारंभ महापूजेने होणार असल्याचे सांगितले. ही दुचाकी यात्रा राज राजेश्वर मंदिर, विठ्ठल मंदिर चौक, काळा मारुती, सिटी कोतवाली चौकातून मोठे राम मंदिर मार्गे जुना कपडा बाजार, जैन मंदिर,गांधी चौक, तहसील ऑफिस, श्री राणी सती मंदिर, श्री गुरुद्वारा प्रबंधक समिती न्यू राधाकिसान प्लॉट मार्गे अशोक वाटिका येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून मदनलाल धिंग्रा चौकातून टॉवर चौक, रतनलाल प्लॉट चौक,नेकलेस रोड मार्गे सिव्हिल लाइन चौकातून जवाहर नगर चौक, १२ ज्योतिर्लिंग मंदिर तेथून राऊत वाडी मार्गे जठारपेठ चौकातून संकल्प ढोल पथकाच्या सोबत सातव चौक मार्गे बिर्ला लेआऊट मधील जलाराम मंदिर येथून मार्गक्रमण करत समारोप बिर्ला राम मंदिर येथे महाआरतीने होणार आहे. तत्पूर्वी मंदिरात रामरक्षा पठण होणार आहे. या यात्रेतील मार्गात येणाऱ्या सर्व मंदिरांना ध्वज प्रदान करण्यात येणार आहे.

यामध्ये लाठीकाठीचे प्रात्यक्षिक आणि गुलाब बाबा बँड पथकाचा समावेश राहणार आहे. या यात्रेत अकोल्यातील नागरिक पारंपरिक वेशभूषेत, फेटे घालून सहभागी होणार आहेत. तसेच यात्रेत मर्यादा पूरुषोत्तम प्रभू श्रीराम, सीता माई, लक्ष्मण, राम भक्त हनुमान यांचा राम दरबार विशेष आकर्षण राहणार आहे. या नववर्ष स्वागत यात्रेत अकोल्यातील सर्व राष्ट्र प्रेमी नागरिक बंधु भगिनींनी सहपरिवार सहभागी व्हावे, असे आवाहन समितीचे स्वागत समिती अध्यक्ष अरविंद देठे, स्वागत समिती उपाध्यक्ष डॉ. पार्थसारथी शुक्ल, रामप्रकाश मिश्रा, डॉ. अभिजित नालट, मंगेश वानखडे, डॉ. प्रविण चव्हाण संस्कृती संवर्धन समिती, अकोलाचे अध्यक्ष प्रा. नितीन बाठे, संयोजक विनोद जकाते, सहसंयोजक स्वानंद कोंडोलीकर, राम भिरड, कोषाध्यक्ष शरद वाघ, महिला संयोजिका सोनल ठक्कर, रश्मी कायदे, मीनाक्षी आपोतीकर, प्रचार व प्रसार प्रमुख समीर थोडगे यांनी केले आहे, अशी माहिती या वेळी देण्यात आली.

वाढीव पाणी देयकप्रकरणी शिवसेना शिंदे गटाचा ठिय्या

पाणी कर वाढीव बिलांची होळी, निषेध आंदोलन

अकोला , दि. २९ : मनपा पाणीपुरवठा विभागातर्फे चुकीच्या पद्धतीने नागरिकांना दिलेल्या पाणीपट्टीच्या देयकांसह नागरिकांना होणाऱ्या दूषित व गढूळ पाणीपुरवठ्याविरोधात शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी आक्रमक होत शुक्रवारी आंदोलन केले. पाणीपट्टीच्या वाढीव व अवास्तव बिलांची होळी करत निषेध व्यक्त केला. पाणीपट्टीत नागरिकांना चुकीची व वाढीव रक्कम आकारण्यात येत असून, त्यावर प्रशासनाचे दुर्लक्ष आहे, असा आरोप आंदोलकांनी केला. काही नागरिकांना सरासरीच्या कितीतरी पटीने बिल आकारले, असा आरोप करत शिवसेना शिंदे गटाने प्रशासनाला शुद्ध पाणीपुरवठा करण्याची मागणी केली. अन्यथा आंदोलनाची तीव्रता वाढवण्याचा इशारा यावेळी दिला. मनपा आवारात झालेल्या या आंदोलनात शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अश्विन नवले, अबब.. ४७ हजारांचे पाणीपट्टीचे बिल काही नागरिकांना सरासरीच्या कितीतरी पटीने पाणी देयके दिली. एका नागरिकाला ४७ हजारांचे पाणी बिल दिल्याचे आंदोलकांनी निर्दशनास आणले. चुकीची पाणी देयके दुरुस्तीसाठी नागरिकांना मनपा फेऱ्या माराव्या लागत असल्याचे आंदोलकांनी म्हटले. चुकीची देयके दुरुस्तीची मागणी यावेळी केली.

सेनाड यांच्या रांगोळीची लंडन बुक्समध्ये नोंद

भारतातील सर्वांत मोठी गणपती रांगोळी

अकोला , दि. २९ : अकोला सर्वाधिक गणपतींचा अद्वितीय संग्रह असलेल्या नंद उद्यान व गणपती संग्रहालयात नंद संग्रहालयातर्फे, नंद मित्र मंडळाच्या सहकार्याने मार्चला ऐतिहासिक उपक्रम यशस्वी झाला. १२,०००, स्क्वेअर फूट क्षेत्रफळात, तब्बल अडीच हजार किलो रांगोळीचा वापर करून चित्रकार व कलाकार अमृता कुशल सेनाड यांनी गणपतीचे पोर्ट्रेट रांगोळीतून साकारून विक्रम प्रस्थापित केला. त्यांच्या अप्रतिम कलाकृतीने गणेशभक्ती, रांगोळी कलेचा सुंदर मिलाफ घडवला. हा अनोखा कलाविष्कार पाहण्यासाठी गणेशभक्त, कलाप्रेमींनी गर्दी केली होती. रांगोळीचे सौंदर्य पाहून उपस्थितांनी भारावून जाऊन त्याचे कौतुक केले. या उपक्रमाची नोंद लंडन बुक्स ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड, आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स संस्थानी घेऊन अमृता यांना त्याविषयीचे प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान केले. जिल्हा भाजपतर्फे अमृता यांचे विशेष कौतुक करून त्यांचा या वेळी मानचिन्ह देऊन सत्कार केला. ६५००० गणपती संग्रहाच्या प्रेरणेतून मिळाली कल्पना नंद उद्यान व गणपती संग्रहालयात प्रदीप नंद यांनी गेल्या वर्षांपासून संकलित केलेल्या हजार गणपतींच्या संग्रहाच्या प्रेरणेतून, देशातील सर्वांत मोठी गणपतीची रांगोळी साकारण्याचा ऐतिहासिक विक्रम घडवण्यात आला. या उपक्रमाची प्रेरणा घेण्यात आली.

देवघरासाठी मिनी गुढी ६० ते ३०० रुपयांपर्यंत

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती , दि.२९ : अमरावती साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या पाडव्याच्या शुभमुहूर्तावर घरोघरी गुढी उभारली जाते. गुढीची पूजा करून नववर्षाचे स्वागत केले जाते. पूर्वीच्या काळी उंच-उंच गुढी उभारण्याची स्पर्धा असायची; परंतु आता फ्लॅट संस्कृती आल्याने गुढ्यांची उंची कमी झाली आहे. त्यामुळे बाजारात रेडिमेड मिनी गुढी विक्रीसाठी उपलब्ध झाली आहे. त्या ६० रुपयांपासून ते ३५० ते ४०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. यंदा मागणी टक्क्यांनी वाढल्याने व्यावसायिक सांगतात. रेडिमेड गुढी ही कमी जागेत उभारता येते. त्यामुळे छोटी काठी, छोटा तांब्या, नक्षीदार साडी आणि त्यावरील नाजूक सजावट अशी भुरळ पाडणारी गुढी सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. सुकलेल्या लाकडापासून तयार केलेल्या छोट्याशा गुढ्या बाजारात उपलब्ध आहेत. सर्वात लहान ६० रुपयांची तर सर्वात मोठी ३०० ते ३५० रुपयांपर्यंतची गुढी आहे. गुढीसाठी विविध प्रकारचे कापड बाजारात नव्याने दाखल झाले आहेत. खणाचे कापड आणि पैठणी महिलांना आकर्षित करत आहे. २०,२८, आणि ३६ इंच अशा स्वरूपातील कापड लहान-मोठ्या गुढीसाठी उपलब्ध आहेत. त्यांची किंमत २०० ते ४०० रुपयांपर्यंत आहे. मागणीत झाली वाढ पूर्वीच्या तुलनेत गेल्या दोन वर्षांपासून रेडिमेड गुढीला मागणी वाढली आहे. मागच्या वर्षाच्या तुलनेने ही मागणी २० टक्के जास्त आहे. लहान गुढी देवा जवळ ठेवता येत असल्याने तिला मागणी आहे. -संजय पाटील, विक्रेता. पारंपरिक गुढ्यांचे यंदाही ठरणार आहे आकर्षण पारंपरिक सजावट केलेल्या नावीन्यपूर्ण रंगीबेरंगी रेडिमेड गुढी विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

साहित्याची खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी शहरातील बाजारात दिसून येत आहे. यात मोची गल्ली, जवाहर गेट, अंबा मंदिर परिसर, राजापेठ, नवाथे, राजकमल चौक, इतवारा लहान, पण दिसायला सुंदर असलेल्या रेडिमेड गुढीला ग्राहकांची अधिक पसंती आहे. खणाचे कापड, सोनेरी लेस आणि सोनेरी गोंड्यांनी गुढीचे वस्त्र सजवले आहे.

आठवडाभरात पारा ३७ अंशावर भाजीपाला, फळबागांना चटका



बुलडाणा : गेल्या आठ दिवसांपासून तापमान ३७ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा अधिक आहे. त्याचा परिणाम फळबागा व भाजीपाल्यावर होत आहे. उत्पादनात घट होत असल्याने शेतकरी अडचणीत आहेत. भाजीपाला व लिंबू महाग होणार आहेत. उष्णतेमुळे पिकांचे नुकसान कमी करण्यासाठी किंवा टाळण्यासाठी उपाययोजना करणे शेतकऱ्यांना आवश्यक आहे. बुलडाणा जिल्ह्यात फेब्रुवारी महिन्यापासूनच वातावरणात बदल होत आहे. त्यामुळे आजारपणात वाढ झाली होती. सध्या व्हायरल कमी झाले असले तरी पिकांवर संकट येऊ घातले आहे. गहू काढण्यात आला असला तरी कांदा अजून बाकी आहे. फळबागा व भाजीपाला सध्या लागवड केलेले आहेत. यात प्रामुख्याने वांग्याचा समावेश आहे. लग्न सराईचे दिवस येत असल्याने वांग्याची मागणी अधिक असते. मात्र या वांग्यावर उष्णतेचा परिणाम होत असून चवही लागत नाही. ऊन्हाचा भाज्यांना फटका बसत आहे.

रेडी रेकनर दरात १० टक्क्यांनी होणार वाढ

रियल इस्टेट क्षेत्रात गुंतवणूकदारही अडचणीत

■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा , दि. २९ : बुलडाणा शासनाच्या वतीने रेडीरेकनर दरात आता पुन्हा १० टक्क्यांनी वाढ करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे मध्यमवर्गीयांचे घराचे स्वप्न अधुरे राहणार की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तर दुसरीकडे रियल इस्टेट मध्ये गुंतवणूक करणाऱ्यांनाही या दरवाढीचा झटका बसणार आहे.

बुलडाणा हा मागासलेला जिल्हा समजला जातो. तरीही बुलडाणा शहरात प्लाटींगचे भाव व घराचे भाव गगणाला भिडले असल्याचे चित्र गेल्या काही वर्षांपासून दिसत आहे. शहरातील विष्णूवाडी, चैतन्यवाडी, रामनगर, केशव नगर, एकता नगर, राजमाता जिजाऊ नगर, क्रीडा संकुल परिसर, जांभरुण रोड येथील जमिनीचे भाव गगणाला भिडले आहेत. तर जिल्ह्यातील मलकापूर, शेगाव, मेहकर, चिखली, देऊळगावराजा, खामगाव या तालुक्यांतील जमिनीचे भाव ही वेगाने वाढत आहेत.

केवळ बुलडाणा सारख्या शहरात महिन्याकाठी तब्बल सुमारे घर खरेदी-विक्रीचे व्यवहार पार पाडले जातात. या एका महिन्याच्या व्यवहारातून बुलडाणा शहरातर्फे शासनाला महिन्याकाठी तब्बल अडीच कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. उर्वरित तालुक्यांची आकडेवारी वेगवेगळी आहे. जिल्ह्यात खरेदी विक्रीची परिस्थिती अशी असताना शासनाच्या वतीने नव्या वर्षात रेडीरेकनरचा दर१० टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे शासनाच्या महसुलात कर, स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन शुल्क स्वरुपात मिळणाऱ्या महसुलात वाढ तर होणार आहे. परंतु मध्यमवर्गीयांच्या आवाक्यात असलेला प्लॉट व घराची खरेदी आता आवाक्याबाहेर जाणार आहे. मालमत्ता खरेदी करताना खरेदीदारास अधिक रकमेचा भूर्दंड होण्याची शक्यता आहे.

१ एप्रिलपासून रेडी रेकनरच्या दरात वाढ होणार असल्याने याचा परिणाम थेट खरेदी-विक्री व्यवहारावर होवू शकतो. यात तब्बल१० टक्के वाढ झाल्याने रियल इस्टेट मध्ये गुंतवणूक करण्याची इच्छा असणाऱ्यांना अधिकचा कर, स्टॅम्प डयुटी, रजिस्ट्रेशन शुल्क या सह एजंटची फी या सर्व प्रक्रियेतून जावे लागणार आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांना याचा फटका तर बसणार आहे. रेडी रेकनर दरात १० टक्के वाढ होणार आहे, या संदर्भात मार्च अखेरीस सार्वजनिक सुटीच्या तीन दिवस कार्यालय चालू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. परंतु दर वाढी संदर्भात सविस्तर आदेश मिळाल्यावरच किती वाढ होईल? याचे चित्र स्पष्ट होणार आहे. सागर पवार, सहदुय्यम निबंधक वर्ग दोन अधिकारी, बुलडाणा. २४,३०, व ३१ रोजी राहणार कार्यालय सुरु मार्च महिन्याच्या अखेरीस यंदा तीन सार्वजनिक सुट्या आल्याने नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी शासनाच्या वतीने राज्यभरातील दुय्यम निबंधक कार्यालय सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. वैनगंगा-नळगंगा कल्पाने वाढवला भाव केंद्र व राज्य शासनाच्या वतीने जिल्ह्यात वैनगंगा नळगंगा नदी जोड प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. हा प्रकल्प जिल्ह्यातील मोताळा, मलकापूर, नांदुरा, शेगाव या मार्गाने होणार असून यामुळे या भागातील लाखो शेतकऱ्यांना सिंचनाची सोय होणार आहे. परिणामी आतापासूनच या भागातील शेतीचेही भाव हे गगणाला भिडले आहेत.

आमदार अण्णासाहेब पाटील यांना मराठा महासंघाच्या वतीने अभिवादन

अकोला: अकोला अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा शाखा अकोलाच्यावतीने जिल्हा कार्यालयात मराठा महासंघाचे संस्थापक कै. आमदार अण्णासाहेब साहेब पाटील यांना अभिवादन करण्यात आले . कार्यक्रमाचे सुरुवातीला मराठा महासंघाचे विदर्भ प्रदेश उपाध्यक्ष राम मुळे, जिल्हाध्यक्ष सुरेश ठाकरे, महिला जिल्हाध्यक्ष सुनीता ताथोड यांच्याहस्ते अण्णासाहेब पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांनी अण्णा साहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. स्वर्गीय अण्णासाहेब पाटील यांनी मराठा महासंघाची स्थापना केल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात झंजावात निर्माण केला व मराठ्यांची बलाढ्य संघटना उभी केली. कामगारांना त्यांचे हक्क मिळवून देऊन त्यांच्या शाळा निर्माण केल्या. कामगारांचे जीवनमान उंचविण्याकरिता अनेक योजना राबवल्या, अशी भावना अतिथींनी व्यक्त केल्या. या प्रसंगी जिल्हाध्यक्ष सुरेश ठाकरे ,महिला जिल्हाध्यक्ष, सुनीताताई ताथोड ,भुजंगराव देशमुख यांनी अण्णासाहेब पाटील यांच्या कार्याविषयी माहिती विशद केली. कार्यक्रमाला महासंघाचे जिल्हा सरचिटणीस ॲड. अमोल सूर्यवंशी, युवक कार्याध्यक्ष आदेश अंधारे, महिला अध्यक्ष अलका देशमुख, सविता शेळके, सुनीता देशमुख, ज्योती भांबेरे, ॲड. प्रवीण महल्ले, दिलीप देशमुख, डॉ. शशिकांत पवार, विनायकराव गायकवाड आदी होते.

वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन

अपुरी पार्किंग, अनधिकृतरीत्या फेरीवाल्यांचा त्रास

अकोला: वाहनांच्या वाढत्या संख्येच्या तुलनेत अकोला शहरात वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. मुख्य रस्त्यांवरील अपुरी पार्किंग व्यवस्था, वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन होत आहे. शहरातील अनेक चौकात सिग्नल व्यवस्था आहे. मात्र अनेकदा ते बंद असतात. तर वाशीम बायपास सारख्या मोठ्या चौकात सिग्नल नाहीत. रविवारी ऑटोचा धक्का लागल्याच्या कारणावरून हत्याकांड घडले. त्यात एका युवकाचा जीव गेला. गांधी रोड हा शहरातील प्रमुख वर्दळीचा मार्ग असून येथे नेहमीच वाहनांची मोठी गर्दी असते. अपुरी पार्किंग व्यवस्था आणि अनधिकृतरीत्या रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांमुळे वाहतुकीची कोंडी होते. परिणामी, पादचाऱ्यांना चालताना अडचणी येतात. शहरातील मुख्य बाजारपेठेत वनवे रस्ता असतानाही वाहनचालक त्याचे पालन करत नाहीत.

महासागर

रविवार, दि. 30 मार्च 2025

अमरावती

पान 3

वोकाट्राइब प्रायव्हेट लिमिटेड कंपनी अमरावती ला हॉस्पिटलमध्ये कामासाठी मेगा भरती सुरू आहे

वार्ड बॉय -150 , जीएनएम नर्सिंग -100 , हाऊस कीपिंग-90 ही पदे भरती सुरू आहे.

संपर्क 07620610131 09623316598 08305146500

8 तास ड्युटी राहील

पगार 10,000-15000

संपर्काची वेळ सकाळी 10 ते संध्याकाळी 5 पर्यंत.

घरात जबरदस्तीने घुसण्याचा प्रयत्न

अमरावती - पैशाच्या व्यवहारावरून एका महिलेच्या घरात घुसून तिच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. ही घटना 23 मार्च रोजी रात्री 11 वाजता फ्रेजरपुरा पोलिस स्टेशन परिसरात घडली. या घटनेची तक्रार महिलेने 28 मार्च रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी अविनाश लव्हाळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

खरीप हंगामात कपाशीचे दोन कोटी पॅकेट्स लागणार

इतर पिकांचे दर पडले : बियाणे विक्रेत्यांनी नोंदविली मागणी

महासागर प्रतिनिधी

अमरावती(दि.29)- खरीप हंगामात संपूर्ण विदर्भामध्ये लागवडीचे चित्र बदलण्याची शक्यता आहे. खुल्या बाजारात कापूस वगळता इतर सर्व पिकांचे दर कोलमडले आहे. किमान आधारभूत किमतीमध्ये सरकार कापूस खरेदी करेल या विश्वासावर शेतकरी कापसाची लागवड करण्याची शक्यता आहे. यातूनच बियाणे विक्रेत्यांनी गुढीपाडव्याच्या पर्वावर दोन कोटी पॅकेटस् (प्रत्येकी 475 ग्रॅम) कपाशी बियाण्यांची मागणी नोंदविली आहे. खरीप हंगामाला वेळ असला तरी बियाण्यांची नोंदणी तीन ते चार महिने आधीच करावी लागते. त्या दृष्टीने बियाणे निर्मिती करणाऱ्या कंपन्या

बाजारपेठेतून मागणी नोंदवत आहे. त्यानुसार कंपन्या धोरणही ठरवीत आहे. सध्या याच पद्धतीने येणाऱ्या काळात कुठल्या बियाण्यांची मागणी अधिक राहील यानुसार नोंदणी केली जात आहे.

मक्याचे क्षेत्र वाढणार

विदर्भात मका लागवड होत नसला तरी याचे उत्पादन अधिक होत असल्याने शेतकरी मका लागवडीकडे वळण्याची शक्यता आहे. यातून मक्याच्या बियाण्यांची मागणी विक्रेत्यांकडून नोंदविली जात आहे. एक नवे पीक विदर्भात पाहायला मिळणार आहे. याशिवाय इथेनॉल निर्मितीसाठी मक्याची मागणी होत असल्याने याला चांगला दर राहण्याची शक्यता आहे. संरक्षणाच्या दृष्टीने शेतकऱ्यांना मोठी व्यवस्था करावी लागणार आहे.

तुरीचे क्षेत्र वाढेल; सोयाबीनचे मात्र घटेल

येणाऱ्या हंगामात तूर लागवडीकडे शेतकऱ्यांचा कल राहणार आहे. त्या दृष्टीने आंतरपीक म्हणून शेतकरी तुरीच्या बियाण्यांची मागणी मोठ्या प्रमाणात करीत आहेत. दुसरीकडे सोयाबीनचे दर कमालीचे घसरले आहेत. यामुळे येणाऱ्या हंगामात सोयाबीनचा पेरा 15 ते 20 टक्क्याने कमी होण्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.

कापूस उत्पादक प्रांतावर विक्रेत्यांच्या नजरा

- संपूर्ण राज्यात 330 कंपन्या बियाण्यांची विक्री करतील. सुमारे दोन कोटी पॅकेटस् बियाणे लागतील. त्यानुसार याची नोंदही करण्यात येत आहे. कापूस उत्पादक प्रांत म्हणून विदर्भाकडे पाहिले जाते.
- या ठिकाणी कापसाचा पेरा मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये 15 ते 20 टक्के क्षेत्र कापसाखाली अधिक येण्याची शक्यता नियोजन विभागाकडून वर्तविण्यात आली आहे. त्यानुसार कंपन्यांकडे बियाण्याची नोंदणी केली जात आहे.

शेतातील झोपडीतून साहित्य चोरणाऱ्याला अटक

बडनेरा आणि खोलापुरीगेट पोलिसांची संयुक्त कारवाई

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 29) - अकोली ते पिंपरी रस्त्यावरील शेतात बांधलेल्या झोपडीतून साहित्य चोरी करणार्या एका आरोपीला बडनेरा आणि खोलापुरी गेट पोलिसांनी संयुक्त कारवाईत अटक केली. अटक केलेल्या आरोपीचे नाव अभिषेक उर्फ रोहित देवानंद गवई (20, रा. पिंपरी यादगिरे) असे आहे.

साई नगर स्थित चंदन नगर येथील रहिवासी अशोक यादव यांचे अकोली ते पिंपरी रस्त्यावर एक शेत आहे. त्यांनी शेतात बांधलेल्या झोपडीत पाण्याचे यंत्र, अँगल ग्राइंडर तसेच तूर आणि सोयाबीन असे साहित्य व धान्य ठेवले होती. दरम्यान अज्ञात आरोपींनी झोपडीतून एकूण 44 हजार रुपयांचा माल चोरून नेला. याबाबत बडनेरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. बडनेरा

आणि खोलापुरीगेट पोलिसांनी संयुक्त कारवाई करत आरोपी अभिषेक गवई याला अटक केली. अभिषेकला बडनेरा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. बडनेरा पोलिस पुढील कारवाई करत आहेत.

छायाचित्रकाराला मारहाण करून लुटले

कॅमेरा, लाईट आणि लेन्स चोरले

घातखेडा रस्त्यावरील घटना

महासागर प्रतिनिधी

अमरावती, दि. 29) फ्रेजरपुरा पोलीस स्टेशन हद्दीतील घातखेडा रोडवर एका छायाचित्रकारावर हल्ला करून त्याचा कॅमेरा, लेन्स आणि लाईट्स लुटल्याची घटना घडली. चोराने छायाचित्रकार जवळील 2 लाख 60 हजाराचे साहित्य चोरून नेले आहे. या या घटनेची तक्रार 28 मार्च रोजी वेदांत गिरीश मानमोडे (19, रा. बुधवारा, अंबागेट, अमरावती) यांनी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी पाच ते सहा आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार, वेदांत मानमोडे हे व्हिडिओ शूटिंगचे काम करतात. ते त्यांचा मित्र संस्कार कुमुद साहू (19) याच्यासोबत रील बनवण्याचे सुध्दा काम करतात. 28 मार्च रोजी दुपारी 1.30 वाजता संस्कारने फोन करून सांगितले की त्याला दुपारी 4 वाजता घातखेडा गावात शूटिंगसाठी जायचे आहे. त्यानंतर दोघेही एमएच 27 सीजे 7647 या क्रमांकाच्या दुचाकीने घातखेडा येथे निघाले. वेदांत गाडी चालवत होता आणि संस्कार मागे कॅमेरा बॅग धरून बसला होता. दरम्यान डॉ. राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेजकडे जात असताना, मागून 4 दुचाकीवर पाच ते सहा जण आले. त्यानंतर त्यांनी वेदांतच्या गाडीला पल्सर मागून धडक दिली. ज्यामुळे वेदांत आणि संस्कृत खाली पडले. त्यानंतर आरोपीने चाकू काढला आणि संस्कारच्या डोक्यावर आणि गालावर वार केले. ज्यामुळे तो जखमी झाला. त्यानंतर त्यांनी त्याच्याकडून कॅमेरा बॅग हिसकावून घेतली आणि सर्वांनी अमरावतीकडे पळ काढला. सर्व तरुणांनी आपले चेहरे दुप्पट्याने बांधले होते. त्याच्या बॅगेत 2 लाख रुपये किमंतीचा कॅमेरा, 50 हजार रुपये किमंतीचा लेन्स आणि 10 हजार रुपये किमतीचा लाईट, असे एकूण 2 लाख 60 हजार रुपयांचे साहित्य चोरी गेले.

विधी संघर्षीत बालकासह पाच जणांनी केली बॅग लिफ्टिंग

गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 ची कारवाई

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 29) दिवसाढवळ्या जबरी चोरी प्रकरणात विधी संघर्षीत बालकासह पाच जणांचा समावेश असल्याची माहिती उघडकीस आली. पोलिसांनी या गुन्ह्याचा 24 तासांत छडा लावून एका विधी संघर्षीत बालकाला ताब्यात घेतलेले आहे.

पोलिस सुत्रानुसार, 27 मार्च रोजी मंगेश वासुदेव काळे (26, रा. पवननगर, अमरावती) हे दुकानातील 2 लाख 75 ह जार 320 रुपये बॅगमध्ये घेवून प्रीया टॉकीनकडून राजकमलकडे जात होते. दरम्यन सायंकाळी 5.30 ते 6.15 वाजताच्या दरम्यान एका अज्ञात इसमाने मंगेशला अडविले. त्यानंतर त्याने आपल्या आणखी इतर दोन साथीदारांचे मदतीने मंगेशजवळील बॅग जबरीने हिसकावून दुचाकीवर पळ काढला. या घटनेच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला होता. सदरचे

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ पोलिस अधिकार्यांनी तात्काळ घटनास्थळास भेट दिली तसेच पोलीस आयुक्त यांनी बैठक घेवून मार्गदर्शन केले. सदर गुन्हा उघड करण्याकरीता पोलिस आयुक्तांनी आदेशीत केले होते. या गुन्ह्यात गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी घटनास्थळी भेट देवून परिसरातील सि.सि.टी.व्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. त्यानंतर फुटेज व गुप्त माहितीवरून पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेले दुचाकी वाहन व आरोपींची ओळख पटविली. त्यानंतर पोलिसांनी एका विधि संघर्षीत बालकांस ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेले वाहन ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याला विश्वासात घेवून विचारपूस केली असता सदरचा गुन्हा त्याने त्याचे साथीदार छोटू उर्फ सोहेल शहा शफीक शहा (रा.कबीरनगर, सरकारी दवाखान्याजवळ, अमरावती), अहमद खाँ नूर खाँ (रा.कबीरनगर, सरकारी दवाखान्याजवळ, अमरावती), फैजान उर्फ गिल्ला वल्द फिरोज खान (रा. साजीया नगर, अमरावती), रिझवान (रा. रहेमत नगर, अमरावती), दादू वल्द नसीम (रा. साजिया नगर, अमरावती) यांनी मिळून केल्याचे निदर्शनास आले. चौकशीदरम्यान माहिती पडले की, त्यांनी शेख सरफराज शेख सिराज (रा. छअसाल नगर) याच्या घरी जावून जबरी चोरी केलेल्या पैशाचे वाटप केले. पुढील तपासकामी विधिसंघर्षग्रस्त बालकांस कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. तसेच उर्वरित आरोपी व दुचाकी वाहनाचा कसोशीने शोध सुरु आहे.

80 हजाराचा मुद्देमाल जप्त

याप्रकरणात पोलिसांनी एक दुचाकीसह 80 हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, जयदत्त भंवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे, पोलिस हवालदार सतीष देशमुख, फिरोज खान, सचिन बहाळे, अलीमउद्दीन खतीब, नाझीमउददीन सैयद, विकास गुडधे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक अलिमोददीन खतीब, अशोक खंगार, किशोर खेंगरे यांनी तसेच सायबरचे एपीआय अनिकेत कासार व पोलिस हवालदार निखील माहूरे यांनी केली आहे.

मुख्याध्यापकाने केला शिक्षिकेचा विनयभंग

बडनेरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 29) बडनेरा हद्दीतील एका शाळेतील मुख्याध्यापकाने महिला शिक्षीकेचा विनयभंग केला. पिडित महिलेच्या तक्रारीरून 27 मार्च रोजी बडनेरा पोलिसांनी आरोपी मुख्याध्यापक संतोषकुमार नायर याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

तक्रारीनुसार, शिक्षिका या दोन वर्षांपासून बडनेरा हद्दीतील एका नामांकित शाळेत कार्यरत आहेत. तेथील मुख्याध्यापक संतोषकुमार हे नेहमी शिक्षिकेचा अचानक हात पकडत होते. 10 ऑगस्ट रोजी संतोषकुमार यांनी शिक्षिकेच्या कक्षात जाऊन त्यांचा हात पकडला होता. शिक्षिकेने विरोध करून, मुख्याध्यापकाला एक थप्पड लगावली होती. परंतू संतोषकुमारने शिक्षिकेला नोकरीवरून काढून टाकण्याची धमकी दिली. त्यावेळी शिक्षिकेला शिविगाळ करून संतोषकुमार निघून गेला. शिक्षिकेने हा प्रकार आपल्या पतीला सांगितला. परंतू बदनामीच्या भितीपोटी शिक्षिकेने तक्रार केली नाही. परंतू काही दिवसानंतर संतोषकुमारने शिक्षिकेच्या घरी येतो, असे म्हटले. त्यामुळे शिक्षिकेने पोलिसात तक्रार करण्याबाबत संतोषकुमारला म्हटले होते. त्यानंतर शिक्षिकेने हा प्रकार शाळेतील वरिष्ठ महिला पदाधिकारीला दिली आणि सीसीटीव्ही लावण्याबाबत म्हटले. परंतू त्यांनीही प्रतिसाद दिला नाही. त्यानंतरही संतोषकुमारकडून शिक्षिकेला त्रास देणे सुरुच होते. त्यामुळे शिक्षिकेने संतोषकुमारच्या पत्नीला हा प्रकार सांगितला. परंतु त्यांनीही पतीकडून भाग घेत महिला शिक्षिकेशी वाद केला. या प्रकार शाळेतील वरिष्ठांपर्यंत पोहोचला, त्यावेळी शिक्षिकेला राजीनामा देण्यास सांगण्यात आले. त्यामुळे शिक्षिकेने राजीनामा दिला. दरम्यान आता एका महिला शिक्षिका नोटीस कालावधीवर काम करीत आहे. असे शिक्षिकेने पोलिस तक्रारीत म्हटले आहे. यावरून बडनेरा पोलिसांनी मुख्याध्यापक संतोषकुमारविरुध्द गुन्हा नोंदविला.

वीज देयके भरून थकबाकी केली शून्य

न हजारो रुपयांच्या व्याजापासून केली बचत ■ ग्रामीण पोलिस अधीक्षकांचा पुढाकार

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 29) - अमरावती जिल्ह्यामध्ये ठिक ठिकाणी ग्रामीण पोलीस कार्यालये आहेत. परंतू योग्य नियोजनाअभावी दरमहा वेगवेगळ्या कार्यालयांची वीज बिल थकबाकी वाढत होती. त्यामुळे अमरावती ग्रामीण पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी तत्काळ नियोजन आणि उपाययोजना करून जिल्ह्यातील सर्व ग्रामीण पोलिस कार्यालयाशी संबंधित 42 लाख रूपयांच्या वीज बिलांचा दोन टप्प्यात भरणा केला. त्यामुळे मार्च 25 पर्यंतच्या वीजबिलाची थकबाकी शुन्य झाली आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण पोलिस कार्यालयाशी संबंधित पोलीस चौकी, ठाणे,अधीक्षक कार्यालय यांना दरमहा 4 ते 5 लाख रूपयाचे वीज बिल येते. परंतू सर्व कार्यालयाचे वीज बिल नियमित आणि एकत्रितरित्या पोलिस अधीक्षक कार्यालयात पोहचत नसल्याने सदर बिले एकत्रितपणे भरण्यामध्ये अडचणी येत होत्या. परिणामी त्याचे रूपांतर 40 लाख रूपयाच्या थकबाकीत झाले. परंतू थकबाकीमुळे विनाकारण विलंब शुल्क आणि व्याज यांचा भुरदंड पडत असल्याचे लक्षात आल्यानंतर ग्रामीण पोलीस अधीक्षकांनी त्याची गंभीरतेने दखल घेत अधिनस्त

कार्यालयातील सर्व वीज बिले एकत्रित रित्या भरण्याबाबत उपाययोजना करण्याचे निर्देश सूरज बोंडे पोलीस उपअधिक्षक यांना दिले.

त्यानंतर कार्यालय अधीक्षक ज्योती आखरे यांनी कनिष्ठ श्रेणी लिपिक राजेश टेंभुर्णे व पंकज रेलकर यांच्या सहकार्याने जिल्हास्तरावरील बिलांची एकत्रित माहिती महावितरण अमरावती मंडळ कार्यालयाचे उच्चस्तर लिपिक प्रीतेश पाटकर यांच्याकडून व्यवस्थापक वित्त व लेखा विकास बांबल यांच्या मार्गदर्शनात उपलब्ध असलेल्या निधीनुसार तयार करून घेतली. त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण पोलिस स्टेशन, चौकी यांची देयके उपलब्ध असलेल्या निधीनुसार नियमित निघत गेली, मंजूर होऊन त्याचा भरणा होत गेला व त्याचा परिणाम म्हणून मार्च महिना संपण्यापूर्वीच जिल्ह्यातील ग्रामीण पोलिस स्टेशन/चौकी/शाखा यांची थकबाकी शून्यावर आल्याने व्याजापोटी भराव्या लागणाऱ्या हजारो रूपयाची बचत झाली.

मार्च महिना आर्थीक वर्षाचा अंतिम महिना असल्याने संपूर्ण वर्षाचा ताळेबंद करण्याचा महिना असल्यामुळे महावितरणचे अधिकारी, अभियंते व कर्मचारी प्रत्येक थकबाकीदार वीज ग्राहकाच्या दारी जात आहेत. पोलिस अधिक्षक विशाल आनंद सिंगोरी (आयपीएस) यांनी जिल्ह्यातील ग्रामीण पोलिस कार्यालयाच्या वीज बिलाची थकबाकी शुन्य करण्याकरता घेतलेल्या पुढाकाराबद्दल आणि केलेल्या सत्वर कार्यवाहीबद्दल अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी आभार व्यक्त केले.

खारतळेगाव शेतशिवारात आग

अनेक महाकाय वृक्ष स्वाहा

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 29) - अमरावती मार्गावरील खारतळेगाव शेतशिवारात (दि.28) रात्रीच्या वेळी धुरे साफ करण्यासाठी लावण्यात आलेल्या आगीत अनेक महाकाय वृक्ष जळून खाक झाले. यामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकर्यांनी धुरे साफ करण्याच्या उद्देशाने शेतात आग लावली होती. मात्र योग्य देखरेख न केल्यामुळे ही आग आटोक्यात न राहता मोठ्या प्रमाणात पसरली. परिणामी, अनेक महाकाय वृक्ष आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. या

घटनेमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धूर पसरला होता. अशा वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. या आगीत अनेक महत्त्वपूर्ण वृक्ष नष्ट झाले आहेत, ज्यामुळे पर्यावरणीय संतुलनावर परिणाम होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी शेतातील धुरे साफ करताना अधिक काळजी घेण्याची आवश्यकता आहे. दरम्यान या प्रकाराची नोंद प्रशासनाने घेतली आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

लागोपाठ रेल्वे अपघाताच्या घटनांमूळे

धामणगाव रेल्वे स्थानकांवरील सुरक्षा उपाययोजना चर्चेत

सलील काळे

धामणगाव रेल्वे,(दि.29) – भारतीय रेल्वेच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे, धामणगाव रेल्वे स्टेशनवर गेल्या तीन दिवसांत घडलेल्या तीन दुर्दैवी घटनांनंतर विशेषत्वाने. या घटनांमुळे रेल्वे प्रशासनाच्या सुरक्षा उपाययोजनांवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, येथील अपुऱ्या सुविधा आणि संवेदनशीलतेचा अभाव याकडे लक्ष वेधले गेले आहे. रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ), रेल्वे प्रशासन आणि स्थानिक पोलिस यांच्यातील समन्वयाच्या अभावामुळे या घटना घडल्याचे मत तज्ञांकडून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर, रेल्वे सुरक्षा उपाययोजनांचा आढावा घेणे आवश्यक ठरते. रेल्वे सुरक्षा बलाची भूमिका रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) हे भारतीय रेल्वेच्या सुरक्षेचे प्रमुख अंग मानल्या जाते. 1985 मध्ये स्थापन झालेल्या या बलाला रेल्वे मालमत्तेचे संरक्षण आणि प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आरपीएफ ला रेल्वे कायदा, 1989 अंतर्गत शोध, अटक आणि तपासाचे अधिकार आहेत. धामणगावातील घटनांमध्ये त्रक्रक्र ची उपस्थिती असूनही, बडनेरा रेल्वे पोलिसांच्या उशिरा आगमनामुळे परिस्थिती हाताबाहेर गेली. यामुळे स्थानिक पोलिस आणि आरपीएफ यांच्यातील ताळमेळ वाढवण्याची गरज अधोरेखित झाली आहे. धामणगावातील घटनांनी रेल्वे सुरक्षा उपाययोजनांमध्ये सुधारणांची गरज अधोरेखित केली आहे. रेल्वे प्रशासनाने तंत्रज्ञानाचा वापर आणि कर्मचारी प्रशिक्षण यावर भर देत असले तरी, स्थानिक पातळीवर कार्यक्षमता आणि संवेदनशीलता वाढवणे आवश्यक आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी प्रशासन, आरपीएफ आणि स्थानिक नागरिक यांच्यातील सहकार्य मजबूत करणे ही काळाची गरज आहे. या घटनांमधून धडा घेऊन रेल्वे प्रशासनाने तात्काळ पावले उचलली, तरच भविष्यातील दुर्घटना टाळता येतील.

आरपीएफ आणि जीआरपी मधील फरक

रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) आणि सरकारी रेल्वे पोलिस (जीआरपी) यांच्यातील मूलभूत फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे. आरपीएफ हे केंद्रीय सशस्त्र पोलिस दल असून, त्यांचे प्राथमिक कार्य रेल्वेच्या मालमत्तेचे संरक्षण आणि रेल्वे परिसरातील सुरक्षितता सुनिश्चित करणे आहे. याउलट, त्रक्रक्र हे राज्य सरकारच्या पोलिस दलाचा भाग असून, रेल्वे परिसरात घडणाऱ्या गुन्ह्यांचा तपास आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. उदाहरणार्थ, एखाद्या दुर्घटनेत चोरी किंवा हत्या झाल्यास आरपीएफ तपास करते, तर आरपीएफ स्टेशन आणि गाड्यांच्या सुरक्षेवर लक्ष केंद्रित करते. धामणगावात रेल्वे स्थानकावर झालेल्या घटनांमुळे जीआरपी चा विलंब आणि आरपीएफचा हलगर्जीपणा तसेच दोन्ही यंत्रणांमधील समन्वयाचा अभाव उघड झाला आहे.

रेल्वेने सुरक्षेसाठी उचलली पावले आहेत

- **कवच सिस्टीम :** रेल्वे गाड्यांच्या टक्कर टाळण्यासाठी स्वयंचलित संरक्षण प्रणाली लागू करण्यात आली आहे. ही यंत्रणा सिग्नलिंग त्रुटी आणि मानवी चूक यांचा धोका कमी करते.
- **इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग :** रेल्वे ट्रॅक आणि सिग्नल यांचे व्यवस्थापन सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे.
- **फॉग सेफ्टी डिव्हाइस :** धुक्याच्या काळात दृश्यमानता कमी झाल्यास चालकांना मदत करण्यासाठी ही उपकरणे बसवली आहेत.
- **राष्ट्रीय रेल संरक्षा कोष :** रेल्वे सुरक्षा उपायांसाठी विशेष निधी उपलब्ध करून पूल, ट्रॅक आणि स्टेशन सुधारणांवर भर दिला जात आहे.
- **सुरक्षा हेल्पलाइन :** प्रवाशांसाठी 182 ही टोल-फ्री क्रमांकाची सुविधा उपलब्ध आहे, ज्याद्वारे तात्काळ मदत मिळू शकते.

धामणगावातील घटनांमुळे उघड झालेल्या सुविधांची उणिव

- **अपुऱ्या सुविधा:** स्टेशनवर पिण्याच्या पाण्याची कमतरता आणि सुरक्षित चढ-उतारासाठी अपुरे कर्मचारी यामुळे प्रवासी धोक्यात येत आहेत.
- **पोलिसांचा विलंब :** बडनेरा रेल्वे पोलिसांना घटनास्थळी पोहोचण्यास सहा तास लागणे हे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे द्योतक आहे.
- **सुरक्षा कर्मचाऱ्यांची कमतरता :** स्टेशनवर आरपीएफ कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्याने तात्काळ कारवाईत अडथळा येतो.

या उपाययोजना करणे आवश्यक

- **स्टेशन सुधारणा**– पाण्यासारख्या मूलभूत सुविधा वाढवणे आणि प्लॅटफॉर्मवर सुरक्षितता सुनिश्चित करणे. त्रक्रक्र ची संख्या वाढवणे- व्यस्त स्टेशनांवर सुरक्षा कर्मचाऱ्यांची संख्या वाढवून तात्काळ प्रतिसाद सुनिश्चित करणे.
- **पोलिस समन्वय**– स्थानिक आणि रेल्वे पोलिस यांच्यातील समन्वय सुधारण्यासाठी संयुक्त प्रशिक्षण आणि संवाद वाढवणे.
- **प्रवासी जागरूकता**– धावत्या गाडीत चढणे-उतरने टाळणे, ट्रॅक ओलांडण्याऐवजी फूट ओव्हरब्रिजचा वापर करणे याबाबत जागरूकता मोहीम राबवणे.
- **तात्काळ प्रतिसाद यंत्रणा**– दुर्घटनेनंतर मृतदेहाची विटंबना टाळण्यासाठी शवविच्छेदनगृहात त्वरित हस्तांतरणाची व्यवस्था करणे.

जुळ्या शहरात अल्पवयीनांची गुन्हेगारी प्रवृत्ती वाढली

युवकाच्या हल्ल्यात दोन अल्पवयीन जखमी

महासागर प्रतिनिधी

अचलपूर,(दि.29)- अचलपूर पोलीस स्टेशन हद्दीतील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वार समोर चार ते पाच युवकांनी दोन अल्पवयीन मुलांवर चाकुने हल्ला केल्याची घटना गुरुवार रात्री 8 च्या सुमारास घडली. हा हल्ला चार ते पाच आरोपी मधून एका आरोपीला एका दाल मिल मध्ये चोरी केल्याची माहिती त्या जखमी अल्पवयीन मुलाने मिल मालकाला दिल्याच्या रागावरून ही घटना घडल्याची माहिती समोर आलेली आहे. यामध्ये एका अल्पवयीन मुलावर चाकूने पाठीवर हल्ला केल्याने त्याला खाजगी रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आले आहे. या प्रकरणाची अचलपूर पोलीस स्टेशन मध्ये वृत्त लीहेपर्यंत गुन्हा

दाखल झालेला नव्हता. संशयित आरोपींना अचलपूर पोलीस स्टेशन विभागाने अटक करून पुढील चौकशी सुरू आहे. 27 मार्च रोजी अचलपूर पोलीस स्टेशन हद्दीतील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वार समोर दोन अल्पवयीन मुलांवर 8 ते 10 जणांच्या टोळक्याने हल्ला केल्याची घटना घडलेली आहे. यासंदर्भात अचलपूर पोलीस स्टेशन मधून मिळालेल्या माहितीनुसार, 27 मार्च रोजी एका दाल मिल मध्ये आरोपी पैकी एका जणांचे नाव त्या जखमी अल्पवयीन मुलाने मिल मालकाला सांगितले होते. यानंतर मिल मालकाने त्या चोरी करणाऱ्या युवकाला समज देऊन सोडून दिले. मात्र याचा राग मनात धरून त्या आरोपीने जखमी अल्पवयीन मुलाला अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वार समोर बोलविले, यावेळी आरोपी चार ते पाच जण तेथे हजर होते. यानंतर बाचाबाचीत रूपांतर होऊन हाणामारी झाली. आरोपीने आपल्या साथीदारासह त्या अल्पवयीन मुलाच्या पाठीवर चाकूने हल्ला केला. सोबत असलेल्या दुसरा अल्पवयीनहीं जखमी झाला. घटनेची माहिती जुळ्या शहरात वाऱ्यासारखी पसरली. यानंतर अचलपूर पोलीस स्टेशनचे ठाणेदार गजानन मेहत्रे यांनी याची तात्काळ दखल घेत संशयित आरोपींना चौकशी ताब्यात घेतले असून पुढील चौकशी सुरू आहे. यातील 4 आरोपी सज्ञान तर 1 आरोपी हा अल्पवयीन असुन रवीनगर परतवाडा व फॉरेस्ट कॉलनी परतवाडा येथील आहे फिर्यादी नरसाळा (ता.अचलपूर) येथील आहे.

अखेर प्रभाकर झोड यांचे उपोषण मागे

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.29) – अमरावती जिल्हा परिषद शिक्षक सहकारी बँकेच्या संचालक मंडळा विरोधात तातडीने कार्यवाही करावी, दि. 3 मार्च 2025 रोजी उपविधी संदर्भात चुकीच्या पद्धतीने जारी केलेला आदेश तातडीने रद्द करावा, खरेदी आणि इतर निविदा प्रक्रिया संदर्भात शासकीय ऑडिट करावे, नोकर भरती संदर्भात न्यायालयात प्रलंबित याचिकेच्या निर्णयानुसार कार्यवाही करावी, यासह एकूण अकरा मागण्यासाठी गेल्या तीन दिवसापासून विभागीय

सहनिबंधक सहकारी संस्था, कांतानगर, अमरावती यांचे कार्यालय समोर शिक्षक बँक विकास आघाडीच्या वतीने माजी संचालक प्रभाकर झोड आमरण उपोषणाला बसलेले होते. आज उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांचे निर्देशानुसार अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांना जनता दरबारामध्ये आंदोलनकर्त्यांनी निवेदन देऊन चर्चा केली. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे याचे हस्तक्षेपानंतर विभागीय सहनिबंधक प्रवीण फडणीस यांनी मागण्या मान्य केल्याचे लिखित पत्र देत असल्याबाबत आश्वासित केले. यानंतर अवघ्या काही मिनिटांमध्ये विभागीय उपनिबंधक चैतन्य नासरे, जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांनी लिखित पत्र उपोषणकर्त्यांना सादर केले. त्यानंतर आमदार प्रवीण तायडे यांनी उपोषण स्थळी जाऊन प्रभाकर झोड यांना ज्यूस देऊन त्यांचे उपोषण सोडविले.

या.द.व. देशमुख महाविद्यालयात आर्थिक साक्षरता कार्यक्रम

महासागर प्रतिनिधी

तिवसा,(दि.29) – या.द.व. देशमुख कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य विद्याशाखा, इंग्रजी विभाग व अर्थशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आर्थिक साक्षरता कार्यक्रम (दि.28)संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख होते तर प्रमुख अतिथी आर्थिक साक्षरता केंद्र जनजागृती अभियान मोर्शी येथील सहयोगी छाया भिसेकर ह्या होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून शुभांगी चिंचोलकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमात प्रमुख अतिथी छाया भिसेकर यांनी विद्यार्थ्यांना भविष्यात होणाऱ्या महागाईवर आणि आर्थिक अडचणीवर प्रकाश टाकत भविष्यासाठी आर्थिक सक्षम होण्याच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या उपायाबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आजपासूनच

गुंतवणूक करण्याचे आवाहन केले जेणेकरून भविष्यात येणाऱ्या आर्थिक अडचणीवर सहज मात कशी करता येईल. विद्यार्थ्यांनी सर्व माहिती अवगत करून गुंतवणूक करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात नियमित येऊन ज्ञानार्जन करून प्रत्येकाने आर्थिक साक्षरता ज्ञान आणि माहिती संग्रहित करावी असे सांगितले. महाविद्यालयामधील सांस्कृतिक समन्वयक डॉ. प्रशांत हरमकर यांनी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक कलागुणांबद्दल माहिती सांगून त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाचे संचालन इतिहास विभाग प्रमुख डॉ.सोनटक्के यांनी केले. मराठी विभाग प्रमुख डॉ. चरणदास सोळंके, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. श्याम गेडाम, ग्रंथालय विभागप्रमुख प्रा. रविंद्र पाटील, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.गणेश खेकाळे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रा. सारीपुत्र भालेकर, प्रा. सुमित मेश्राम प्रा. पाणबुडे प्रा. सोनवणे प्रा.गणवीर, विद्यार्थी प्रतिनिधी सम्यक तेलमोरे व विद्यार्थिनी प्रतिनिधी अंजली नायसे आदी उपस्थित होते.

उदखेड येथे मिशन पटसंख्या वाढ अंतर्गत प्रभातफेरी

महासागर प्रतिनिधी

अंजनगाव बारी, (दि.29)-पटसंख्या वाढ मोहीम अंतर्गत जि.प. प्राथमिक शाळा उदखेड येथे कुटुंब सर्वेक्षण व प्रभात फेरी तसेच पटसंख्या वाढीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन (दि.29) करण्यात आले. प्रसंगी गावातून प्रभातफेरी काढण्यात आली. इयत्ता पहिली मध्ये दाखल होणाऱ्या विद्यार्थ्याच्या घरी भेट देऊन त्यांना इयत्ता 1 ली मध्ये प्रवेश करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात आले. शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे व पालकांचे स्वागत करण्यात आले. या उपक्रमात उदखेड सरपंच शैलजा खंडार , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा वनिता सोळंके, ग्रा.पं. सदस्य प्रकाश भोयर, प्रिती भांगे, शिक्षक वृंद, अंगणवाडी कर्मचारी सहभागी झाले होते.

क्रीडा स्पर्धेत निवासी मतिमंद विद्यालय सुरवाडीची उंच भरारी

2 सुवर्ण पदकासह पटकाविले रजत पदक, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरव

महासागर प्रतिनिधी

तिवसा,(दि.29) – दिव्यांग कल्याण आयुक्तालय पुणे, क्रीडा संचालनालय स्व. प्रभाकरराव दटके स्मृती संस्था नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित दिव्यांग मुला-मुलींच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा दि. 21 ते 23 मार्च दरम्यान नागपूर येथील रेशिमबाग प्रांगणात आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये निवासी मतिमंद विद्यालय सुरवाडी तिवसा येथील विद्यार्थ्यांनी मतिमंद प्रवर्ग मध्ये अनुक्रमे मनोज जग्गू उईके 100 मीटर व 200 मीटर धावणे मध्ये 2 सुवर्ण, अमृता

शेंद्रे 100 मी. धावणे मध्ये 1 रजत, लक्ष्मी मौजे 50 मी. धावणे मध्ये 1 कांस्य पदक आणि बहुविकलांग प्रवर्ग मध्ये प्रणव शिरभाते बादलीत बॉल टाकणे स्पर्धेमध्ये 1 सुवर्ण , 25 मी. चालणे मध्ये 1 रजत पदक प्राप्त केले. गौरवाची बाब म्हणजे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते निवासी मतिमंद विद्यालय सुरवाडी तिवसा येथील विद्यार्थिनी अमृता शेंद्रे ला 100 मी. धावणे या स्पर्धेचे पारितोषिक देण्यात आले.विद्यार्थ्यांच्या यशस्वी कामगिरीबद्दल संस्थेचे संचालक मंडळ, मुख्याध्यापक व सर्व कर्मचार्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

जिल्ह्यात महिला लैंगिक अत्याचाराचे दोन गुन्हे दाखल

चांदुर रेल्वे व चांदुर बाजारातील घटना

महासागर प्रतिनिधी

अमरावती (दि. 29) – जिल्ह्यात महिला लैंगिक अत्याचाराचे दोन गुन्हे 27 मार्च रोजी उघडकीस आले आहे. चांदुररेल्वे व चांदुरबाजार तालुक्यात या घटना घडल्या असून, या घटनांमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

चांदुररेल्वे तालुक्यात मनोरुग्ण तरुणीवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना 27 मार्च रोजी उघडकीस आली. या घटनेची तक्रार 40 वर्षीय महिलेने 27 मार्च रोजी चांदुररेल्वे पोलिस ठाण्यात दिली. तक्रारीनुसार, मनोरुग्ण तरुणी घरात झोपली होती. दरम्यान तिच्या आईला जाग आल्यानंतर ती घरात दिसली नाही. त्यामुळे त्यांनी मुलीचा शोध घेतला. त्यावेळी आरोपी तरुण हा मुलीवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न करताना दिसला. या घटनेची तक्रार महिलेने चांदुररेल्वे पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी वासुदेव रामजी राठोड (36, रा. चांदुररेल्वे) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. तसेच चांदुरबाजार तालुक्यात घराशेजारी राहणारी एक तरुण शेजारी राहणार्या व्यक्तीच्या घरी मोबाईल चार्जिंगकरिता गेली होती.

दरम्यान आरोपी अनाडी जुगर राठी (40) याने तरुणीला जबरदस्तीने पकडून तिचे तोंड दाबले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यामुळे ती तरुणी गर्भवती राहिली. ही घटना तरुणीला अमरावती येथील रुग्णालयात दाखल केल्यानंतर उघडकीस आली. याप्रकरणात गाडगेनगर पोलिसांनी झिरो डायरी कायमी केली असून, हे प्रकरण चांदुबाजार पोलिसांकडे वर्ग केले आहे.

अचलपूर-रासेगाव रस्त्याच्या कामाने पकडला वेग

महासागर च्या वृत्ताचा परिणाम | नागरिकांनी व्यक्त केला आभार

अचलपूर-रासेगाव मार्गावर दुभाजकाचे काम कासवगतीने

अपघातांचा धोका वाढला

प्रशासनाकडून हस्तक्षेपाची अपेक्षा

महासागर प्रतिनिधी

अचलपूर(दि.29) – काही दिवसांपूर्वी अचलपूर ते रासेगाव मार्ग आणि डिव्हायडरच्या कामाच्या संथ गतीबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली होती. या विषयावर दैनिक महासागर मध्ये बातमी प्रकाशित झाल्यानंतर प्रशासन आणि ठेकेदारांनी तत्काळ दखल घेतली आणि कामाच्या गतीत वाढ केली. आता रस्ता दुरुस्तीचे काम जलद गतीने सुरू असून, नागरिकांनी याबाबत समाधान व्यक्त केले आणि प्रशासनाचे आभार मानले आहेत.

मनुष्यबळ वाढविले

बातमी प्रकाशित झाल्यानंतर संबंधित विभागाने ठेकेदाराला रस्त्याच्या दुरुस्तीचे काम त्वरित पूर्ण करण्याचे आदेश दिले. त्यानंतर मजुरांची संख्या वाढवण्यात आली आणि खोदकाम, समतलीकरण तसेच डिव्हायडर उभारणीची गती वाढवण्यात आली. सध्या रस्त्याचे मजबुतीकरण आणि डांबरीकरणाचे काम वेगाने सुरू आहे.

अद्याप काही अडचणी कायम

जरी रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाने वेग घेतला असला, तरी काही ठिकाणी अजूनही खड्डे बुजवण्याचे आणि समतलीकरणाचे काम बाकी आहे. नागरिकांनी प्रशासनाकडे विनंती केली आहे की, हे काम दर्जेदार पद्धतीने आणि वेळीच पूर्ण करण्यात यावे. वृत्तपत्राच्या माध्यमातून नागरिकांची व्यथा प्रशासनापर्यंत पोहोचली आणि त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला. अचलपूर-रासेगाव रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला आता वेग आला असून, लवकरच हा मार्ग प्रवासासाठी अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर होईल.

अचलपूर-रासेगाव मार्ग अनेक वर्षांपासून खराब स्थितीत होता. रस्त्यात ठिकठिकाणी मोठे खड्डे, धूळ आणि डिव्हायडरच्या अपूर्ण कामामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता आणि वारंवार अपघात घडत होते. प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रार करूनही कामाची गती अत्यंत मंद होती. मात्र, जेव्हा हा विषय दै.महासागर ने उचलून धरल्यावर प्रशासन आणि ठेकेदारांनी त्वरीत लक्ष घालून रस्त्याच्या कामाला गती दिली.

पार्वती नगरात अज्ञात तरुणांनी केली कारची तोडफोड

तलवार आणि चाकूने फोडले टायर

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि.29)- खोलापुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणार्या पार्वती नगर परिसरात गुरुवारी मध्यरात्री तीन अज्ञात तरुणांनी हातात तलवार आणि चाकू घेऊन दहशत निर्माण केली. एलआयसी एजन्टच्या कारची तोडफोड केली. हे तरुण एवढ्यावरही नाही थांबले तर, त्यांनी कारचे टायर चाकुने आणि तलवारने फोडले. दगडफेक करून दहशत निर्माण केली.यासंदर्भात एलआयसी एजंट ऋषिकेश कुलकर्णी यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत परिसरात लागलेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावर आरोपींचा शोध सुरू केला आहे. माहितीनुसार पार्वती नगर परिसरात गुरुवारी रात्री तीन युवक हातात तलवार आणि चाकू घेऊन दहशत निर्माण करत होते. त्यांनी

परिसरात राहणारे ऋषिकेश कुलकर्णी यांची फोर व्हीलर एमएच 04/एफझेड/4893 ची तोडफोड केली. कारच्या काचा फोडल्या आणि त्याचे टायर तलवार आणि चाकू ने कापले. पश्चात त्यांनी परिसरात दगडफेक केली. यामुळे परिसरात दहशत निर्माण झाली होती. तिन्ही तरुण हातात चाकू आणि तलवार घेऊन परिसरात फिरत होते. हा संपूर्ण घटनाक्रम परिसरामध्ये लागलेल्या सीसीटीव्हीत कैद झाला आहे. शुक्रवारी (दि.28) सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर नागरिकांची बरीच गर्दी कुळकर्णी यांच्या घरासमोर जमा झाली होती. त्यांनी घटनेची तक्रार पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांनी कलम गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

शालिनीताई मेघे होमिओपॅथिक रुग्णालयाचा महिलांच्या आरोग्यासाठी पुढाकार

नागपूर, २९ मार्च : दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (डीयू) सोबत संलग्न असलेले नागपूर येथील वानाडोंगरी स्थित शालिनीताई मेघे होमिओपॅथिक रुग्णालय आणि महाविद्यालय यांनी मार्च २०२५ रोजी रायपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन येथे महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन केले. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र श्रम कल्याण मंडळ गट कार्यालय २ यांच्या सहकार्याने हा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात मान्यवर पाहुण्यांची उपस्थिती लाभली. सौ. शीतलताई मून आणि सौ. दिपावलिताई कोहाड यांच्या पाठिंब्यामुळे महिलांचे आरोग्य आणि सर्वांगीण कल्याणाची पुष्टी झाली.

शालिनीताई मेघे होमिओपॅथिक रुग्णालयातील अनुभवी वैद्यकीय तज्ज्ञांनी या शिबिरात महिलांना मोफत आरोग्य तपासणी व उपचार उपलब्ध करून दिले. या वैद्यकीय चमूत डॉ. विनोद खवासे, डॉ. अमृता क्षीरसागर, डॉ. नयन दुर्बळे आणि सौ. श्वेता सावरकर यांचा समावेश होता. त्यांनी महिलांना योग्य मार्गदर्शन आणि उपचार दिले.

या शिबिरात महिलांची विविध आजारांसाठी तपासणी करण्यात आली ज्यात किडनी स्टोन, मूळव्याध, त्वचारोग, मुरूम, उच्च रक्तदाब, मधुमेह, सिकल सेल ॲनिमिया, थायरॉईड विकार, सौंदर्य व केसांचे विकार, वजन नियंत्रण, संधिवात, लहान मुलांचे आजार आणि स्त्रीरोग यांचा समावेश होता. डॉक्टरांनी प्रत्येक महिलेला वैयक्तिक सल्ला आणि होमिओपॅथिक उपचार दिले.

या उपक्रमाचा एकूण ७० महिलांनी लाभ घेतला. महिलांना आवश्यक वैद्यकीय सेवा व सर्वांगीण आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. महिलांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढवणे आणि होमिओपॅथी उपचारांच्या फायद्यांची माहिती देणे हे या शिबिराचे उद्दिष्ट होते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनात महाराष्ट्र श्रम कल्याण मंडळ गट कार्यालय २ यांनी मोठी मदत केली. तसेच, हिंगणा केंद्र समन्वयक सचिन रोंगे आणि जयताळा केंद्र समन्वयक दर्शन सोमकुवर, तसेच धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते शरद पाटील, सौ. वैशाली कोरडे, सौ. वृक्षवंती वरखडे आणि सौ. ऋषिता इवणाते यांनी दिलेल्या विशेष योगदानामुळे आणि त्यांच्या प्रयत्नांमुळे शिबिर सुरळीत पार पडले.

शालिनीताई मेघे होमिओपॅथिक रुग्णालय आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत भारबत यांनी सांगितले की, संस्थेतर्फे वानाडोंगरी येथे आठवड्याच्या वेगवेगळ्या दिवशी तज्ज्ञ होमिओपॅथिक डॉक्टरांकडून विशेष क्लिनिक चालवले जात आहेत. या क्लिनिक्समध्ये फक्त २० रुपये फीमध्ये दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात येतात, जेणेकरून गरजू आणि वंचित लोकांना सुलभ उपचार मिळू शकतील.

मोदी सरकार भारताच्या सुरक्षिततेशी खेळणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करेल, स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक घुसखोरांसाठी घातक ठरेल: अमित शहा

नवी दिल्ली, २९ मार्च : केंद्रीय गृहमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी लोकसभेत स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक २०२५ वर उत्तर देताना स्पष्ट संदेश दिला की हे विधेयक घुसखोरांसाठी घातक ठरणार आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेत किंवा देशाच्या विकासात योगदान देण्यासाठी देशात येणाऱ्या प्रत्येक परदेशी नागरिकाचे स्वागतच आहे. मात्र, देशाच्या सुरक्षिततेशी खेळणाऱ्यांना मोदी सरकारकडून कठोर प्रत्युत्तर दिले जाईल. भारत काही धर्मशाळा नाही जिथे कुणीही घुसखोर येऊन स्थायिक होऊ शकतो. केवळ देशानेच नव्हे, तर संपूर्ण जगाने पाहिले आहे की गेल्या १० वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत एक सुरक्षित, महासत्ता आणि विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने वेगाने प्रगती करत आहे.

भारतीय राजकारणाला नव्याने परिभाषित करणारे आणि देशाच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणारे नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्या नेतृत्वाखालील सरकारने स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक आणले आहे. हे विधेयक देशाच्या सुरक्षिततेला आणि अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच, शिक्षणव्यवस्थेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी, संशोधन आणि विकासासाठी मजबूत पाया घालण्यासाठी आणि २०४७ पर्यंत भारताला प्रत्येक क्षेत्रात जागतिक नेता बनवण्यासाठी हे विधेयक मदत करेल.

वसुधैव कुटुंबकम् चा मंत्र जगाला देणाऱ्या भारताने निर्वासितांसाठी ऐतिहासिक योगदान दिले आहे. जगातील सर्वात लहान अल्पसंख्याक जर कुठे सर्वात मोठ्या सन्मानाने राहत असतील तर तो भारत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्या मार्गदर्शनाखाली, शेजारील देशांमधील सहा अत्याचारग्रस्त समुदायांना नागरिकत्व दुरुस्ती कायद्यांतर्गत भारतात आश्रय देण्यात आला आहे.

भारतीय राजकारणातील चाणक्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमित शहा यांनी पश्चिम बंगाल सरकारवर टीका करताना सांगितले की, बांगलादेशशी असलेल्या २,२१६ किलोमीटर लांब सीमेमध्ये १,६५३ किलोमीटर भागात कुंपण उभारण्यात आले आहे. मात्र, अजूनही ५६३ किलोमीटर सीमा खुली आहे, ज्यातील ११२ किलोमीटर क्षेत्र हे नद्या, कालवे आणि डोंगराळ भूभागाचे असल्याने तेथे कुंपण घालणे कठीण आहे. उर्वरित ४५० किलोमीटर भागात कुंपण उभारता येऊ शकते, पण बंगाल सरकार जमीन उपलब्ध करून देत नाही, म्हणून हे काम रखडले आहे.

भाजपला तळागाळातून शिखरावर नेणारे अमित शहा यांनी भाकीत केले की २०२६ च्या निवडणुकांमध्ये पश्चिम बंगालमध्ये भाजपचे सरकार येईल आणि त्यानंतर घुसखोरांना प्रवेश करता येणार नाही. नवीन भारत घडवण्यावर लक्ष केंद्रित करत अमित शहा यांनी स्पष्ट केले की स्थलांतर आणि परदेशी नागरिक विधेयक हे साधे, ठोस आणि वेळेवर निर्णय घेणारे कायदे असलेल्या व्यवस्थेसह भारताला २०२७ पर्यंत जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि २०४७ पर्यंत एक विकसित राष्ट्र बनवण्याचे स्वप्न साकार करण्यात मैलाचा दगड ठरेल.

सणासुदीच्या निमित्ताने खास कलेक्शन्स आणि अतुलनीय सवलतींसह पीएनजी ज्वेलर्स सोबत साजरा करा गुढीपाडवा!

पोल्मी, प्रथा, कथा, सप्तम आणि इना हे लोकप्रिय कलेक्शन सादर

नागपूर, २९ मार्च : महाराष्ट्रातील सर्वात विश्वासार्ह ब्रँड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएनजी ज्वेलर्स ने नववर्षाच्या निमित्ताने आपले खास कलेक्शन सादर केले आहेत, ज्यात पोल्मी, प्रथा, कथा, सप्तम आणि इना या कलेक्शन्सचा समावेश आहे. गुढीपाडव्याच्यानिमित्ताने २४ मार्च ते ३० एप्रिल २०२५ दरम्यान सर्व पीएनजी ज्वेलर्सच्या स्टोरमध्ये ग्राहकांसाठी आकर्षित सवलती दिल्या जाणार आहेत.

गुढीपाडवा हा नवीन वर्षाची आणि समृद्धतेची सुरुवात मानला जातो. या शुभप्रसंगी पीएनजी ज्वेलर्सच्या मोहिमेत पारंपरिक आणि आधुनिक अशा दोन्ही प्रकारातील सोने, चांदी, हीरे, आणि प्लॅटिनमच्या दागिन्यांवर खास सवलती देण्यात आल्या आहेत. लग्नसराई सारख्या महत्वाच्या प्रसंगांसाठी, सणासुदीला भेटवस्तू देण्यासाठी, वैयक्तिक सौंदऱ्यासाठी या किंवा सोन्यात गुंतवणूक करण्यासाठी ही एक उत्तम संधी आहे.

गुढीपाडवा मोहिमेसाठी सादर करण्यात आलेलं मुख्य कलेक्शन म्हणजे पोल्मी, पारंपरिक पोल्की (अनकट) हीरे, पुरातन कारागिरी यांचा संगम असलेले दागिने हे राजेशाही सौंदर्य आणि आधुनिक आकर्षण यांचे प्रतीक आहे. या कलेक्शन मधील प्रत्येक दागिना हा राजेशाही देखावा प्रदान करत असून सर्वांना परवडणारा तसेच प्रत्येक स्त्रीला तिचे सौंदर्य जपण्याची संधी प्रदान करणार आहे. सोन्याच्या किंमती उच्चांकी पातळीवर पोहोचत असून देखील ग्राहक त्याच उत्साहाने खरेदी करत आहेत. ग्राहक जुने सोने बदलून नवीन दागिने खरेदी करत आहेत, जेणेकरून त्यांना आर्थिक स्थिरता मिळते तसेच सणासुदी किंवा लग्नसराईच्या दागिन्यांची देखील खरेदी होते. गुढीपाडवा हे नव्या वर्षाची सुरुवात असल्याने पारंपरिक आणि स्टडेड दागिन्यांना अधिक महत्व दिले जाते. तसेच सध्या सुरू असलेली महाराष्ट्रीय लग्नसराईमुळे ही मागणी आणखी वाढवत आहे. भारतात सोने हे फक्त किंमतीवर नाही तर भावनिक आणि शुभ प्रसंगी खरेदी केले जाते. त्यामुळे यंदाचा गुढीपाडवा सर्वांसाठी तेजस्वी आणि उत्साही असेल असा आमचा विश्वास आहे. अशी पीएनजी ज्वेलर्स चे व्यवस्थापकीय संचालक आणि अध्यक्ष डॉ सौरभ गाडगीळ यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली.

या गुढीपाडव्याला खास बनवण्यासाठी पीएनजी ज्वेलर्स ने जुन्या सोन्याच्या बदल्यावर ०% कपात, सोन्याच्या दागिन्यांवर मेकिंग चार्जेसमध्ये ३०% पर्यंत सूट आणि हिऱ्यांच्या दागिन्यांवर मेकिंग चार्जेसमध्ये १००% पर्यंत सूट दिली आहे. या नववर्षाला आणखी आनंदमय करण्यासाठी आजच आपल्या जवळच्या पीएनजी ज्वेलर्स स्टोअरला किंवा पीएनजी ज्वेलर्सच्या ऑनलाइन वेबसाईटला भेट द्या!

एमओसी कॅन्सर केअर नागपूरची विशेष स्तन कॅन्सर (मॅमोग्राफी) निदान मोहीम

नागपूर, २९ मार्च : मार्च महिन्यातील जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून एमओसी- नागपूर ने जिल्यात २३ ते २७ मार्च २०२५ दरम्यान विविध ठिकाणी स्तनांच्या कर्करोग तपासणी आणि लवकरच्या टप्प्यात निदानहेतु मॅमोग्राफी शिबिराचे आयोजन केले होते. एमओसी नागपूर चे प्रसिद्ध कर्करोगतज्ञ डॉ. मकरंद रणदिवे यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली सावनेर, मानेवाडा, मिलिट्री हॉस्पिटल कामठी, जरीपटका व मेघरे हॉस्पिटल भंडारा येथे मॅमोग्राफी शिबीर यशस्वीरित्या पार पडले.

डॉ. मकरंद रणदिवे यांनी उपस्थित महिलांना स्तनांच्या व इतर कर्करोगाबद्दल विस्तृत माहिती दिली. उपस्थित सर्व महिलांना स्तनांचा, गर्भाशयाचा व गर्भाशयमुखाच्या कर्करोगाची लक्षणे कशी ओळखावी याबद्दल माहिती दिली व त्यांचे शंकानिरासनही केले.

शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यासाठी डॉ. मकरंद रणदिवे, डॉ. पूजा चांडक, डॉ. शिवम पुनियानी, डॉ. अदिती गुल्हाने, डॉ. रोहिणी पाटील, डॉ. प्रियंका जेसवानी, डॉ. प्रदीप मेघरे भंडारा व सामजिक कार्यकर्ते श्री. गुड्डू केवलरामानी यांचे विशेष सहकार्य लाभले. या शिबीरात एकूण १५० मॅमोग्राफी करण्यात आल्या व किमान ५०० महिलांनी उत्कृष्ट सहभाग घेत परिसरात जागरूकता निर्माण करण्याचे यशस्वी कार्य पार पडले.

रॉकी या डायनॅमिक रॉक स्टारच्या रूपात सुधांशु पांडेची वागले की दुनियामध्ये एंट्री

मुंबई, २९ मार्च : सोनी सबवरील वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिका भावनिक दृष्ट्या समृद्ध आणि दैनंदिन जीवनाशी निगडीत कथा सादर करून लहान-थोर सर्वांचे निखळ मनोरंजन करते. या मालिकेत प्रसिद्ध अभिनेता सुधांशु पांडेची एंट्री होणार आहे. वंदनाचा (परिवा प्रणती) कॉलेजचा जुना मित्र रॉकीच्या रूपात तो वागले कुटुंबात येणार आहे. या रॉकस्टारच्या आगमनामुळे वागले कुटुंब काहीसे विस्कळित होणार आहे.

या रोमांचक कथानकात राजेश (सुमित राघवन) आणि वंदनाची मुले एका मोठ्या कॉन्सर्टची तिकिटे न मिळाल्याने हिरमुसतात. पण परिस्थितीला एक आश्चर्यकारक वळण मिळते, जेव्हा वंदना सांगते की त्या कार्यक्रमातील कलाकार रॉकी हा तिचा कॉलेजचा जुना मित्र आहे आणि कधी काळी त्याने एक गाणे म्हणून तिला लग्नाची मागणी देखील घातली होती. हे ऐकल्यावर राजेशला मनातून ईर्ष्या आणि कुतूहल वाटू लागते. जेव्हा रॉकी वागलेंच्या घरी येतो, तेव्हा त्याच्या लौकिकामुळे शेजारपाजारचे लोक त्याला बघण्यासाठी पार वेडे होतात. त्याचा रॉकस्टार अवतार, लांब वाढवलेले केस आणि आकर्षक व्यक्तिमत्व यामुळे तो सर्वांना मोहित करतो. वंदना आपल्या जुन्या मित्राला भेटून अगदी आनंदून जाते. पण असुरक्षितता आणि ईर्ष्या यांच्या भोवऱ्यात अडकलेल्या राजेशला मात्र आपल्याला एक स्पर्धक आल्यासारखे वाटते!

राजेश स्वतःला सावरू शकेल का की रॉकीच्या आकर्षक व्यक्तिमत्वामुळे राजेशचे जग हादरून जाईल?

आपल्या या भूमिकेविषयी बोलताना सुधांशु पांडे म्हणाला, मला स्वतःला गायला, परफॉर्म करायला आवडते, त्यामुळे रॉकी सारख्या रॉकस्टारची भूमिका करण्याची संधी मला मिळाल्यावर मला आनंदच झाला. ही भूमिका मला लगेच भावली. रॉकी मोहक आहे, त्याच्यात भरभरून आत्मविश्वास आहे, आणि त्याच्यात असे काही गारुड आहे की ज्यामुळे सगळेजण लगेच त्याच्याकडे आकर्षित होतात. पण असे असूनही मुळातून तो साधा आहे आणि आपल्या जुन्या मैत्रीची त्याला कदर आहे. वागले की दुनियाच्या समस्त टीमने खूप आपलेपणा दाखवला. त्यामुळे हा अनुभव माझ्यासाठी आणखीनच आनंददायक झाला. सुमित आणि परिवासोबत काम करण्याचा अनुभव छान होता. अशा मजेदार कथेमध्ये त्यांच्यासोबत अभिनय करताना फार मजा आली.

शौर्य सॅलरी अकाउंटसाठी बंधन बँकेने भारतीय हवाई दलाशी सामंजस्य करार केला

नवी दिल्ली, २९ मार्च : बंधन बँकेने आज घोषणा केली की, त्यांनी भारतीय हवाई दलासोबत बंधन बँक शौर्य पगार खाते प्रदान करण्यासाठी एक सामंजस्य करार केला आहे. हे विशेषतः संरक्षण कर्मचाऱ्यांसाठी डिझाइन केलेले कॉर्पोरेट पगार खाते आहे. बंधन बँकेच्या १७०० हून अधिक शाखांमधून आयएएफ कर्मचाऱ्यांना झीरो बॅलन्स बचत खाते, स्वतःसाठी आणि कुटुंबासाठी संरक्षण, आकर्षक व्याजदर असे अनेक विशेष फायदे मिळू शकतात. शौर्य पगार खात्यासाठी आयएएफ सोबतचे सहकार्य हे बँक संरक्षण कर्मचाऱ्यांसाठी एक स्पर्श सेवा केंद्र असण्याव्यतिरिक्तचा फायदा आहे जिथे बँकेने ५५७ नियुक्त शाखांद्वारे संरक्षण पेन्शनधारकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सेवा प्रदान करण्यासाठी स्पर्श सेवा केंद्रे स्थापन करण्यासाठी संरक्षण खात्यांच्या नियंत्रक जनरल सोबत भागीदारी केली आहे.

या सामंजस्य करारावर संरक्षण मंत्रालयाचे सहाय्यक हवाई दल प्रमुख (लेखा आणि हवाई माजी सैनिक) एअर व्हाइस मार्शल उपदेश शर्मा व्हीएसएम आणि बंधन बँकेचे सरकारी व्यवसाय गट प्रमुख देबराज साहा यांनी बंधन बँकेच्या शाखा बँकिंग प्रमुख श्री. सुजॉय रॉय, केंद्र सरकार व्यवसाय प्रमुख श्रीमती स्वाती दत्त यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी केली.

या भागीदारीबद्दल बोलताना, बंधन बँकेचे कार्यकारी संचालक आणि मुख्य व्यवसाय अधिकारी श्री. राजिंदर बब्बर म्हणाले, एक आघाडीची अखिल भारतीय बँक म्हणून, बंधन बँक आमच्या प्रत्येक उपक्रमाद्वारे देशाला पाठबळ देण्यासाठी वचनबद्ध आहे.

अभिनेता तन्मय नागर दिसणार पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत

मुंबई, २९ मार्च : सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेतील पुष्पा (करुणा पांडे) या एका धडाडीच्या आणि करारी स्त्रीच्या प्रेरणादायक कथेने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. पुष्पा तिच्या आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक आव्हानाला हिंमतीने आणि सकारात्मकतेने तोंड देताना दिसते. कथानकाला आता एक वेगळे वळण मिळणार आहे आणि या वळणावर तन्मय नागर हा कलाकार अर्जुन सिंह शेखावतच्या रूपात मालिकेत प्रवेश करणार आहे.

प्रख्यात शेखावत मसाले साम्राज्याचा वारस अर्जुन मोठ्या घराण्यातील मुलगा असून त्याचे व्यक्तिमत्व गुंतागुंतीचे आहे. त्याच्यात एक मोहकता आणि आत्मविश्वास आहे पण त्याच्या मागे एक विचित्रपणा आहे. त्याचे संगोपन एका रूढीवादी आणि हिंसक कुटुंबात झाल्यामुळे त्याचे व्यक्तिमत्व गुंतागुंतीचे बनले आहे, मात्र वरकरणी सभ्यतेचा मुखवटा तो मिरवत असतो.

अर्जुन सिंह शेखावतची भूमिका करणारा तन्मय नागर या मालिकेत दाखल होत असल्याचा आनंद व्यक्त करताना म्हणतो, पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत काम करताना आणि अर्जुन सिंह शेखावत ही भूमिका साकारताना मला खूप आनंद होत आहे. मी यापूर्वी साकारलेल्या भूमिकांपेक्षा ही भूमिका अगदी वेगळी आहे. अर्जुनच्या व्यक्तिमत्त्वात अनेक स्तर आहेत आणि ते एक आवेगी आणि जटिल व्यक्तिमत्त्व आहे. अर्जुन अशा जगातून आला आहे, जेथे रूढींचे अवास्तव महत्त्व आहे. त्याचे लहानपण फारसे चांगले गेलेले नाही. त्यामुळे एक अभिनेता म्हणून या व्यक्तिमत्त्वाचे पदर उलगडण्यात एक आव्हान आहे. अर्जुन सर्वसाधारण नायक किंवा खलनायक नाही. तो अनेक दोष, विरोधाभास आणि तीव्र भावनांनी भरलेला एक माणूस आहे. त्यामुळे लोकांना ते जिवंत व्यक्तिमत्त्व वाटेल. मालिकेत पुढे नाट्य, रोमान्स आणि अनपेक्षित ट्विस्ट भरपूर आहेत, जे प्रेक्षकांना खिळवून ठेवतील.

सोनी सबचे कलाकार गुढी पाडव्याच्या आपल्या सुंदर आठवणी शेअर करत आहेत

मुंबई, २९ मार्च : गुढी पाडवा म्हणजे मराठी लोकांचे नवे वर्ष आणि विविध वैज्ञानिक, धार्मिक आणि शेतकी कारणांमुळे हा दिवस लक्षणीय असतो. या सणाच्या निमित्ताने सोनी सबवरील कलाकार सरिता जोशी, आदित्य रेडिज, सायली साळुंखे, चिन्मयी साळवी आणि जयेश मोरे आपल्या गुढीपाडव्याच्या स्मृतींना उजाळा देत आहेत आणि यंदा ते काय करणार आहेत हे देखील शेअर करत आहेत.

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत राधा काकूची भूमिका करत असलेली सरिता जोशी म्हणते, गुढी पाडव्यापासून आमचे नवे वर्ष सुरू होते. आपल्या कुटुंबसमवेत नवी सुरुवात आणि सणाचा आनंद घेण्याचा हा सण आहे. दर वर्षी या दिवशी मी पारंपरिक महाराष्ट्रीयन पोशाख करते, पूजा करते आणि सगळ्यांना आवडणारे गोड-धोड पदार्थ करते. घराबाहेर उभारलेली गुढी हे समृद्धी आणि यशाचे प्रतीक आहे. नववर्षाची सुरुवात सकारात्मक मनाने करण्याची याद ही गुढी देते. लहान असताना त्या गुढीवर घातलेल्या गाठीच्या माळेवर माझा डोळा असे. गुढी उतरवल्यानंतर आम्हाला ती मिळत असे. आजही या दिवशी सिद्धिविनायक मंदिरात दर्शन करून आल्यावर मन कृतज्ञता आणि आशेने भरून जाते. सर्वांना गुढी पाडव्याच्या शुभेच्छा हे वर्ष सर्वांसाठी सुख, आरोग्य आणि यश घेऊन येवो!

पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत दिलीप पटेलची भूमिका करणारा अभिनेता जयेश मोरे म्हणतो, मी सर्वसाधारणपणे सकाळी लवकर माझ्या कुटुंबीयांसह पूजा करतो आणि मग आम्ही सगळे मिळून न्याहारी करतो. मला हा सण खूप प्रिय आहे कारण मी लहान असताना या दिवशी श्रीखंड पुरीचा बेत असायचा. मला अशा आहे की या गुढी पाडव्याला लोक थोडा श्वास घेऊन सरलेल्या वर्षाबद्दल चिंतन करतील आणि नववर्ष कसे असावे याची कल्पना करतील. सर्वांना गुढी पाडव्याच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

वीर हनुमान मालिकेत अंजनीची भूमिका करत असलेली सायली साळुंखे म्हणते, गुढी पाडवा हा माझा आवडता सण आहे. लहानपणी मी बघितले आहे की माझी आई आणि आजी गुढीपाडव्याची जय्यत तयारी करत. या दिवशी आम्ही खरेदी करतो आणि घर सुशोभित करतो. या सणाशी माझ्या सुंदर आठवणी निगडीत आहेत. आईसोबत गुढीसाठी एक छानशी साडी शोधण्याची आठवण त्यातलीच एक आहे. माझ्या कुटुंबाची परंपरा आजही तशीच सुरू आहे. मी देखील दर वर्षी माझ्या कुटुंबासमवेत गुढी उभारते, ती सुशोभित करते. श्रीखंड, पुरी, बटाट्याची भाजी आणि इतर पारंपरिक पदार्थांचा आस्वाद घेतल्याशिवाय या सणाचा आनंद पूर्णच होत नाही. माझ्या सर्व चाहत्यांना मी विनंती करेन की त्यांनी प्रेमाने आणि भक्तीने हा सण साजरा करावा.

राशीभविष्य

मेष : तुम्हाला वडिलोपार्जित संपत्ती मिळू शकते. सहकाजयामुळे व्यवसायात प्रगतीसह लाभ होईल. ऑफीसमध्ये महत्त्वाच्या जबाबदाजया मिळू शकतात. नोकरीत बढती मिळण्याची शक्यता आहे.

वृषभ : आज काही महत्त्वाच्या कामात काही अडथळे येऊ शकतात. दूरदर्शी दृष्टीकोन चांगला राहील. लोकांच्या बोलण्यातून दिशाभूल होऊ देऊ नका. यशाने उत्साही व्हाल. आपल्या कामासाठी समर्पित रहा.

मिथुन : कला आणि अभिनयाच्या जगाशी निगडित लोक महत्त्वपूर्ण कामगिरी करतील. नोकरीच्या ठिकाणी अपूर्ण काम पूर्ण करून आर्थिक लाभ होईल. अनुभव आणि ज्ञानाच्या बळावर तुम्ही पुढे जात रहाल.

कर्क : बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाजया लोकांना त्यांच्या बॉस आणि सहकाजयांमुळे काही गैरसोयीचा सामना करावा लागू शकतो. कामाच्या ठिकाणी बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

सिंह : विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. आज तुम्ही एखाद्या प्रिय मित्रासोबत मनोरंजनाचा आनंद घ्याल. प्रेमप्रकरणात अडथळ्यांना सामोरे जावे लागेल. जास्त जोखीम घेणे टाळा.

कन्या : आर्थिक बाजू चांगली राहील. मित्र तुम्हाला साथ देतील. प्रवास करताना काळजी घ्या. अन्यथा समस्या उद्भवू शकतात. नवीन व्यवसाय सुरू करण्याची योजना यशस्वी होईल.

तुळ : मुलांच्या बाजूने अनावश्यक तणाव जाणवेल. अभ्यासात रस कमी वाटेल. जुन्या मित्राकडून चांगली बातमी मिळेल. व्यवसायाची स्थिती सुधारेल. आर्थिक स्थिती मजबूत होईल.

वृश्चिक : घरगुती समस्यांमुळे वैवाहिक जीवनात परस्पर मतभेद कमी होऊ शकतात. राग टाळा. आज दिवसाची सुरुवात तणावाने होईल. तुम्ही केलेल्या चांगल्या कामाचे श्रेय दुसरे कोणीतरी घेण्याचा प्रयत्न करेल.

धनु : सामाजिक कार्यात सुख-सुविधा वाढतील. कार्यक्षेत्रात अनावश्यक दबाव वाढू शकतो. समन्वयाचे वर्तन ठेवा. इतरांची दिशाभूल करू नका. व्यवसायात नवीन करारांमुळे व्यवसायाची स्थिती सुधारेल.

मकर : आज भाऊ-बहिणींकडून साथ, पाठिंबा मिळाल्याने समाधान मिळेल. घरात जुन्या नातेवाईकाच्या आगमनाने आनंद होईल. वैवाहिक जीवनातील अडथळे दूर होतील.

कुंभ : प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते. नोकरीत उच्च अधिकाजयांशी विनाकारण वाद होऊ शकतात. जवळच्या मित्रासोबत संगीत किंवा मनोरंजनाचा आनंद घ्याल. नातेवाईकाकडून चांगली बातमी मिळेल.

मीन : व्यवसायाच्या क्षेत्रात सुरू असलेल्या कामाचा लाभ मिळेल. उपजीविकेच्या क्षेत्रात तुम्हाला अतिरिक्त मेहनत आणि जबाबदारी मिळेल. कोणाचीही दिशाभूल करू नका. नोकरीत नवीन मित्र मिळतील.

शब्दकोडे क्रमांक २०७०



आडवे शब्द :-

१) पायापर्यंत लोंबणारा अनेक पदरी हार
६) तोंड वासून मोठ्या आवाजात रडणे
१०) धनी
११) सोने
१३) चाळीस शेराचे वजन
१४) वाहणारी हवा
१६) दरवाजा
१७) जिव्हामूलावर लोंबणारा एक मांसपिंड
२०) चावी
२१) रंग
२२) कौशल्य, पटुत्व
२३) तमाशातील एक लोकप्रिय गीतप्रकार
२५) पदार्थाचा सूक्ष्मकण
२६) बांबू
२८) रेशीमासारखा एक प्रकारचा मऊ कापूस
२९) आश्चर्य
३१) भाळाचा झोपाळा
३२) होडी
३३) निरर्थक भटकंती
३४) कुंतीचे पांच पुत्र
३५) अगदी सारखे
३७) गरीब, साधानीतिमान
३९) वालुकामय जमीन
४०) सेवक
४३) नंतर
४५) मोठे माकड
४७) मदतनीस
४८) समुद्रकिनारा
५०) श्रीमंत
५२) अल्प, थोडे
५३) किंमत
५४) दृष्टीभेट
५७) समशेर
६०) दिनांक
६१) गवताचे पान
६२) मीठ
६५) दारू, मद्य
६६) मुख चेहरा
६९) भुईपाडळ नावाची वेल
७१) शाई वा रंगाचा ठिपका कलंक
७२) कर्ज देणारा
७४) क्वचित
७५) मान्यतेचा शब्द
७६) एक प्रश्नार्थक शब्द
७७) बेडकाचे ओरडणे

उभे शब्द :-

१) कमीतकमी व जास्तीत जास्त
२) सामान
३) अर्धांगवायू
४) निद्रा
५) जत्रेतील लाकडी घोड्याचा फिरता पाळणा
६) छिद्र
७) कोलकाताचे विमानतळ
८) गोव्याची राजधानी
९) सडक पथ
१२) दारावरील आवाज
१५) दशानन
१८) स्तुती
१९) बारदान
२४) वरपांगी, दिखाऊ
२५) मनाचा ओढा
२६) कीव येणे, व्यथित होणे
२७) उत्तराधिकारी
२८) हिंदीत श्रावण
३०) पर्णवस्त्र
३१) वर्षप्रतिपदा
३२) अंधार
३५) दुष्ट स्त्री, प्रारब्ध देवता
३६) महिना
३७) वर्षानुवर्षे
३८) युद्ध
४१) राजा
४२) मनगटात बांधलेला मंतरलेला धागा
४४) विधवा
४६) माणूसघाणा, मत्सरी
४९) तृण
५०) भटक्या एका जागी स्थिर, मुक्काम न करणारा
५१) दारू पिणे
५५) वाकलेला, नम्र
५६) राख
५८) छोटासा
५९) वाळूवर रेघोट्या मारून भविष्य सांगण्याची विद्या
६३) बारीक झणझण
६४) सुगंध
६७) पत्थर
६८) फुरसत
७०) च्या बरोबर
७२) प्रामाणिक
७३) तुरुंग

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

अमरावती-मुंबई विमानसेवेचा मुहूर्त पुन्हा टळला

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 29) - अमरावती विमानतळावरून 31 मार्चला प्रवासी विमानसेवा सुरू होणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केली होती. मात्र अद्यापही विमानसेवेचे वेळापत्रक आणि उद्घाटनाची तारीख निश्चित न झाल्याने प्रवासी विमानसेवा सुरू होण्याचा मुहूर्त लांबणीवर पडला आहे. आणखी 20 ते 30 दिवस विमानसेवेच्या उद्घाटनाला लागण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे. अमरावती विमानतळावर नवीन धावपट्टी

तयार करण्यात आली आहे. त्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात आले. येथून एटीआर हे 72 आसनी विमान उडू शकणार आहे. प्रादेशिक कनेक्टिव्हिटी योजनेअंतर्गत मुंबई-अमरावती-मुंबई मार्गावर 'अलायन्स एअर' या कंपनीच्या माध्यमातून एटीआर 72 आसनी विमान सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. विमानतळ आता प्रवासी वाहतुकीसाठी सज्ज झाले आहे. अमरावती विमानतळाला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) परवाना दिला आहे.

अलायन्स एअरची मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा सुरुवातीला आठवड्यातून तीनदा राहणार आहे. मात्र अद्यापही अलायन्स एअरलाइन्सने अद्यापही वेळापत्रक घोषित केलेले नाही. दरम्यान, विमानतळाच्या परिसरात उद्घाटन समारंभाची तयारी सुरू आहे. लवकरच उद्घाटनाची तारीख घोषित होऊ शकते, मात्र 31 मार्चचा मुहूर्त टळला असल्याचे स्पष्ट झाले आहे. आता विमानसेवेच्या वेळापत्रकाची प्रतीक्षा आहे. 'अलायन्स एअर'च्या संकेतस्थळावर विमातळांच्या यादीत अमरावती हे नाव झळकत असले, तरी वेळापत्रक मात्र अद्याप घोषित झाले नाही. त्यामुळे विमानसेवेच्या पुढील अधिकृत उद्घाटनाच्या तारखेची प्रतिक्षा अमरावतीकरांना आहे.

कौंडण्यपूरच्या अंबिका मंदिरात आजपासून रामनवमी महोत्सव

6 एप्रिलपर्यंत श्रीराम कथा प्रवचन

महासागर प्रतिनिधी

कुऱ्हा, (दि.29) - विदर्भाची पंढरी असलेल्या श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथे आई रुक्मिणी हरण मंदिर श्री अंबिका देवी संस्थान येथे चैत्र रामनवमी देवी नवरात्र महोत्सवाला आजपासून प्रारंभ होत आहे. या महोत्सवाअंतर्गत मंदिरात 30 मार्च ते 6 एप्रिल य कालावधीत अनेक कार्यक्रम कायजित करण्यात आले आहे.

महोत्सवादरम्यान मनोकामना सिद्धी निमित्य अखंड दीपज्योत व श्रीराम कथा प्रवचन ज्ञानयज्ञ होणार आहे. त्याची सुरुवात यजमान आर्वी येथील सामाजिक कार्यकर्ते दानशूर रमेशचंद्र राठी यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलन करुन होईल. श्रीराम कथा निरुपन अमरावती येथील प्रवचनकार हभप सुधाकर महाराज ठाकरे आणि संच करणार आहेत. 30 मार्चला सकाळी 8वाजता श्रींची पूजा, अभिषेक होणार असून यजमान विश्वस्त मंडळ कौंडण्यपूर व श्री. व सौ. गिरीधर अग्रवाल (आर्वी) यांचे हस्ते घटस्थापना करण्यात येईल. यजमान विश्वस्त मंडळ दीपज्योती प्रज्वलन यजमान रमेशचंद्र राठी श्री. व सौ. भैय्यासाहेब ठाकरे श्री. व सौ. रमेशभाऊ सोनी (आर्वी) यांचे हस्ते करण्यात येईल. तसेच चैत्र रामनवमी देवी नवरात्र महोत्सवामध्ये दैनंदिन कार्यक्रमात सकाळी 6 ते 7 देवी सहस्त्रनाम, सकाळी 7 ते 8 महापूजा, सकाळी 8.30 वाजता महापूजा, आरती, सकाळी 9 ते दुपारी 12 दुर्गा शप्तशतीपाठ, दुपारी 12 ते 12.30 धूप आरती व नैवेद्य, सायंकाळी 7 ते 7.30 आरती सार, रात्री 8 ते 9 विष्णू सहस्त्रनाम व हरिपाठ, रात्री 9 वाजता दररोज विविध भजन मंडळाद्वारे भजनाचा कार्यक्रम होणार आहे. देऊरवाडा, आर्वी, कौंडण्यपूर, अहिरवाडा, मिर्चापूर, सर्कसपुर येथील वारकरी भजन, महिला मंडळ यांचा सहभाग राहणार आहे. 5 एप्रिलला रात्री होम हवन, 6 एप्रिलला पूर्णाहूती, दुपारी 12 ते 3 पर्यंत महाप्रसाद वितरित करण्यात येईल. भाविक भक्तांनी महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विश्वस्त व पुजारी यांनी केले आहे.

पीडीएमसीत 1 ते 13 एप्रिल दरम्यान दररोज रक्तदान शिबीर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजन

महाविद्यालयाच्या साहित्य समुहाचा उपक्रम

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 29) - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथे वैद्यकीय विद्यार्थ्यांकडुन चालविण्यात येणा?या 'अभिव्यक्ती : द टाइमलेस टेल्स' या साहित्य समुहातर्फे 1 एप्रिल ते 13 एप्रिल दरम्यान दररोज सकाळी 9 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत रक्तदान शिबीराचे आयोजन डॉ. पंजाबराव देशमुख रक्तपेढी, पीडीएमएमसी येथे करण्यात आले आहे. रक्तदानाबाबत जागरूकता वाढवणे आणि गरजू रूग्णांसाठी जीवनदायी रक्ताचा पुरवठा करणे हे या

शिबिराचे मुख्य उदिष्ट आहे. तसेच महामानवाला श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी हा उपक्रम मानवीय दृष्टीकोनातून राबविण्यात येत आहे. या समाजपयोगी कार्यात सहभागी होण्याचे आवाहन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, प्रशासकीय अधिकारी डॉ. स्वप्निल मोहोड यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता 9137377548/ 9325794647/ 7030387576 / 9284076785 या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

राजुरा बाजार येथे आज रुग्णवाहिकेचे लोकार्पण

यशवंत गोसावींच्या व्याखानाचेही आयोजन

महासागर प्रतिनिधी

राजुरा बाजार,(दि.29) - राजुरा बाजार येथील शिवशक्ती देवस्थान मित्र परिवाराने परिसरात रुग्णांच्या सुविधेसाठी रुग्णवाहिका उपलब्ध करुन दिली असून त्याचे लोकार्पण गुढीपाडव्याच्या शुभ मूहूर्तावर रविवार, 30 मार्च रोजी होत आहे. या लोकार्पण समारंभाच्या निमित्ताने पुणे येथील प्रसिद्ध व्याख्याते प्रा. यशवंत गोसावी यांच्या व्याखानाचेही आयोजन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

राजुरा बाजार येथील जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणात हा कार्यक्रम पार पडणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार देवेंद्र भुयार हे राहतील. रुग्णवाहिकेचे लोकार्पण अमरानंद महाराज, हभप रमेश महाराज मानकर आणि सिद्धेश्वर साबळे यांचया हस्ते होणार आहे.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, खा. अमर काळे, खा.डॉ अनिल बोंडे, आ. उमेश यावलकर, सरपंच नीलेश धुर्वे आदी उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवशक्ती देवस्थान मित्र परिवाराने केले आहे.

अमरावतीत तीन दिवसांत तिघांचे नेत्रदान

कुटुंबांकडून सामाजिक बांधीलकीची जोपासना | दिशा नेत्रपेढीत पार पडली प्रक्रिया

महासागर प्रतिनिधी

अमरावती, (दि. 29) - आपल्या कुटुंबातील सदस्याच्या निधनाचे दुःख बाजूला शहरातल्या तीन कुटुंबांनी निधन झालेल्या आपल्या परिवारजनाचे नेत्रदान करुन सामाजिक बांधीलकीच्या भावनेचा परिचय दिला. या मानवीय कार्यामुळे समाजातील तीन अंध बांधवांना जग पाहता येणार आहे. या तीन परिवारांनी नेत्रदानाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या दिशा इंटरनॅशनल आय बँकमध्ये आपल्या परिजनांचे नेत्रकमल दान करण्याची प्रक्रिया पूर्ण केली.

विनायक नीलकंठ फंदे (वय 54 वर्षे), श्रीमती कुसुमबाई माणिकराव दवे (वय 77 वर्षे) व यतींद्र पंढरीनाथ पैठणे (वय 80 वर्षे) यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. कुटूंबातील व्यक्तीच्या निधनामुळे कुटूंबियांना दुःख होणे स्वाभाविक होते. परंतु त्याही परिस्थितीत गरजूंना जग पाहता यावे, या उद्दात भावनेने दवे परिवार, पैठणे परिवार व फंदे परिवाराच्या सदस्यांनी निधन झालेल्या आपल्या परिवारातील सदस्याचे नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला. यासाठी त्यांनी अमरावती मधील दिशा एजुकेशन फाउंडेशनद्वारा संचालित दिशा इंटरनॅशनल आय बँक या धर्मदाय नेत्रपेढीला संपर्क केला.

दिशा ग्रुपचे सचिव स्वप्निल

स्व. श्रीमती कुसुमाबाई दवे | स्व. श्री. यतींद्र पैठणे | स्व. श्री. विनायक फंदे

अरुण गावंडे, दिशा आय बँकेचे मेडिकल डायरेक्टर डॉ. मनिष बबन तोटे, हिमांशू बंड, अनिल देशमुख यांनी मरनोत्तर नेत्रकमळ दान करून घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली. नेत्रदानाचे पवित्र कार्य केल्याबद्दल दिशा एजुकेशन फाऊंडेशन व दिशा इंटरनॅशनल आय बँकच्या अध्यक्षा कुंदा गावंडे व सचिव स्वप्निल गावंडे यांनी फंदे, दवे व पैठणे कुटुंबियांचे आभार मानले. तिन्ही परीवाला मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा अंतर्गत नेत्रदानाचे प्रमाणपत्र देण्यात आले. या सेवाभावी कार्यात फंदे परिवाराचे अक्षय फंदे, निलेश कळंबे, चेतन नवले, दवे परिवारातील प्रज्वल दवे, कु. गौरी दवे, राहुल अंबुलकर व पैठणे परिवारातील ययाती पैठणे, निखिल तिवस्कर, नंदकुमार देव यांच्यासह इतर सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. यावेळी स्व. श्रीमती कुसुमबाई माणिकराव दवे, स्व. श्री. यतींद्र पंढरीनाथ पैठणे व स्व. श्री. विनायक नीलकंठ फंदे यांना श्रद्धांजली अर्पित करणात आली.

देशात अंधत्वाची एक मोठी समस्या आहे. एका व्यक्तीच्या नेत्रदानामुळे दोन कोर्नेअल अंधांना दृष्टी प्राप्त होऊ शकते. मृत्यूनंतर नेत्रदानासाठी काही काळजी घेणे गरजेचे आहे. जसे मृत्यूनंतर सहा तासांपर्येंत नेत्रदान केले जाऊ शकते. त्यामुळे मृत्यूनंतर ताबडतोब दिशा इंटरनॅशनल आय बँकेला संपर्क करावा, मृत व्यक्तीचे डोळे उघडे असल्यास ते बंद करावे व त्यावर ओले कापसाचे बोळे ठेवावे. मृत व्यक्तीच्या डोक्याखाली 2 उश्या ठेवाव्या पंखा बंद ठेवावा, एसी असेल तर सुरु ठेऊ शकता. अशी काळजी घेणे गरजेचे असल्याचे दिशा संस्थेने कळविले आहे. मरनोत्तर नेत्रदानासाठी दिशा इंटरनॅशनल आय बँक, रसिक बिल्डिंग, आयकर ऑफिस मागे, अंबापेठ, अमरावती. मो. 9899898667, 8275539754, 7378656145 किवा स्वप्नील अरुण गावंडे - 9423424450. यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बारावीपर्यंत मराठी विषय अनिवार्य करा

- मराठी विषय महासंघाची मागणी
- जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

महासागर प्रतिनिधी

हिवरखेड, (दि. 29) - मराठी विषय इयत्ता बारावी पर्यंत सक्तीचा करण्याचा शासन निर्णय 13 सप्टेंबर 2024 रोजी पारीत झाला. या आदेशाची अंमलबजावणी शासनाने येत्या शैक्षणिक वर्षापासून (2025-26) करावी अशी मागणी अमरावती जिल्हा मराठी महासंघाने केली आहे. यासंदर्भात जिल्हाध्यक्ष प्रा. ओमप्रकाश ढोरे यांच्या नेतृत्वाखाली निवासी जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

मराठी विषय हा सर्व विद्याशाखांमध्ये अनिवार्य करावा, या शासकिय आदेशाची अद्याप अंमालबजावनी करण्यात आलेली नाही. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी मराठी भाषा प्रत्येक वर्गात शिकविणे बंधनकारक होणे आवश्यक आहे. त्यामुळे शासकीय आदेशांचे पालन करुन या सत्रापासून बारावीपर्यंत प्रत्येक वर्गात मराठी भाषा शिकविणे अनिवार्य करावे, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली. जिल्हाधिका?यांमार्फत हे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, तसेच भाषा व उद्योग मंत्री उदय सामंत यांना पाठविण्यात आले आहे. जिल्हाधिकारी यांना निवेदन देतांना मराठी विषय शिक्षक महासंघाचे सचिव प्रा. सुभाष पारीसे, कार्याध्यक्षा प्रा. डॉ. दिपाली सांगोले, उपाध्यक्ष प्रा. अरुण मेश्राम, प्रा. डॉ. राजेंद्र राऊत, प्रा. रमेश खाडे, प्रा. अशोक डहाके तसेच तालुका प्रतिनिधी प्रा. ज्योती शेंडे (दर्यापूर), प्रा. योगिता देशमुख (अमरावती), प्रा. योगेश सुने (चांदूर बाजार), प्रा.राजेश चव्हाण(धारणी),प्रा.दिलीप जावळे (मोर्शी), प्रा. स्वाती वसू, प्रा. सारीका फरतोडे, प्रा. तृप्ती देशमुख, प्रा. प्रीती डवरे, प्रा. प्रमोद मेंढे, प्रा. पवन ढवळे, प्रा. अमोल डवरे आदी उपस्थित होते.

जिवंत सातबारा मोहीम महसूल विभागाची पारदर्शकता वाढविणारी

महसूल मंत्री बावणकुळे यांची माहिती

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.29) - कुटुंबातील एखाद्याचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या वारसांना शेतजमीन, मालमत्ता आपल्या नावावर करताना अनेकवेळा अडचण येते. आता मात्र मृत खातेदारांच्या वारसांना शेतजमिनीशी संबंधित अधिकार सहजआणि वेगाने मिळावेत, यासाठी राज्य शासनाकडून जिवंत सातबारा मोहीम राबविली जाणार आहे. यामध्ये मृत खातेदारांची नावे कमी करून त्यांच्या वारसांची नावे सातबारावर त्वरित नोंद करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी (दि. 28) पत्रकार परिषदेत बोलतांना दिली.

वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करणार ?

1 ते 5 एप्रिलपर्यंत प्रत्येक गावातील तलाठी मृत खातेदारांची यादी तयार करून मोहिमेद्वारे ही प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. राज्य शासनाने 19 मार्च रोजी यासंदर्भात निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रात ही मोहीम 1 एप्रिलपासून राबविण्याचा आदेश दिला असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

अशी असणार मोहीम

महसूल विभागाकडून स्वत:हून वारसांची नोंद करण्यात येईल. अर्जदाराने अर्ज न करता महसूल यंत्रणा पुढाकार घेईल. मृत व्यक्तींची नावे सात-बारावरून कमी करून वारसांची नोंद केली जाईल. ही संपूर्ण प्रक्रिया फक्त दीड महिन्याच्या कालावधीत पूर्ण केली जाणार आहे.

राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून 100 दिवस कृती कार्यक्रमांतर्गत, ही मोहीम राबविण्यात येणार आहे. या अंतर्गत, सातबारा उतारूयावर मृत खातेदारांच्या वारसांची अधिकृत नोंदणी केली, जाणार आहे. जिवंत सातबारा मोहीम महसूल विभागाची पारदर्शकता वाढविणारी ठरणार आहे. त्यामुळे कायद्याच्या चौकटीत राहून त्वरित निर्णय घेता येणार आहे. परिणामी वेळ आणि पैशाची बचत होणार आहे. महसूल विभागाकडून स्वत:हून वारसांची नोंद करण्यात येईल. अर्जदाराने अर्ज न करता महसूल यंत्रणा पुढाकार घेणार आहे. मृत व्यक्तींची नावे सातबारावरून कमी करून वारसांची नोंद करण्यात येणार आहे. तहसीलदारांची समन्वय अधिकारी आणि जिल्हाधिकारूयांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाणार असल्याचेही बावनकुळे म्हणालेत. तर अमरावती जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था, जलसंधारण, पा द ण रस्ते, पावसाळ्यात उद्भवणारी पूर परिस्थिती यावर आपण उपाय योजना करणार असल्याचे ते यावेळी म्हणाले. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र महापालिकेचे आयुक्त सचिन कलंत्री, जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी अमरावती जिल्ह्याचा 100 दिवस कृती कार्यक्रमांतर्गत सविस्तर माहिती दिली. यावेळी आ. प्रताप अडसड, आ.केवलराम काळे, आ. प्रवीण तायडे, प्रवीण पोटे पाटील उपस्थित होते.

मासोद ते मार्डी रस्त्याचे काम तत्काळ पूर्ण करा!

अन्यथा आंदोलन, गिरीष चौधरींचा इशारा

महासागर प्रतिनिधी

अंजनगाव बारी, (दि. 29) अर्थसंकल्पात मंजूर झालेल्या मासोद ते मार्डी या ग्रामीण मार्ग क्रमांक 8 च्या खडीकरण व डांबरीकरणाचे काम सुरु असून हे काम अत्यंत संथ गतीने करण्यात येत आहे. त्यामुळे या कामाचा वाहनचालक आणि नागरिकांना मोठ्या प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागत आहे. या रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गिरीश चौधरी यांनी केली आहे. अन्यथा 3 दिवसीय

अन्नत्याग आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी लिा आहे.

मासोद ते मार्डी रस्त्याच्या कामाचे कंत्राट मे. एस. व्ही. उगले, अमरावती यांना मिळाले आहे. सदर कामामध्ये रस्त्यावर सहा रपटे पूर्ण करण्यात आले आहे व खडीकरणाचे काम सुरू करण्यात आले. तसेच डांबरीकरणाचे काम 31 मार्चपर्यंत पूर्ण करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. तेव्हा गिरीश चौधरी यांनी आपले आंदोलन मागे घेतले होते. पण गेल्या तीन महिन्यांपासून अजूनही या रस्त्याचे काम सुरू झाले नसल्याने, नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मासोद ते श्री. संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल व मार्डी हा रस्ता दोन वर्षापासून दुर्दशाग्रस्त झाला आहे. रस्त्यावर मोठाले खड्डे पडले असून ठिकठिकाणी रस्ता उखडला आहे.

त्यामुळे अपघात घडून अनेकदा शाळकरी विद्यार्थी, महिला, पुरुष जखमी झाल्याच्या घटना घडल्या. पावसाळ्यात तर हा रस्ता बंद असल्यामुळे सर्वांना 6 किलोमीटरचा फेरा घेऊन जावे लागते. हार्ट हॉस्पिटल, शाळा, मेडिकल कॉलेज, इथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना रोज त्रास होतो. या रस्त्यावर कोणी मृत्युमुखी पडले तर याला सर्वस्वी शासन, कॉन्ट्रॅक्टर, बडनेरा मतदार संघाचे आमदार, ग्रामपंचायत जबाबदार राहिलं असे गिरीष हरिश्चंद्र चौधरी यांचे म्हणणे आहे.

रस्त्याचे काम गतीने पूर्ण करण्यासाठी 15 जानेवारी व 10 फेब्रुवारी रोजी चौधरी यांनी निवेदन देवूनही सार्वजनिक बांधकाम विभाग त्याकडे दुर्लक्ष करुन जनतेची फसवणूक करीत असल्याचा आरोप त्यांनी केला असून हे काम तात्काळ पूर्ण करण्याची मागणी केली आहे. कंत्राटदार कामात दिरंगाई करित असताना आमदार आणि प्रशासनाकडून त्यांना पाठीशी घातले जात असल्याचेही चौधरी यांचे म्हणणे आहे. याबाबत दखल घेतली गेली नाही तर 14 एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीपासून उपोषण सुरू करण्याचा इशारा गिरीश चौधरी यांनी दिला आहे.

नांदगाव खंडेश्वर येथे अवैध सावकाराच्या घरी धाड

आवश्यक 44 दस्तऐवज जप्त

महासागर प्रतिनिधी

अमरावती,(दि.29) - जिल्हा सहकारी संस्था उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या आदेशाने जिल्ह्यातील परवाना धारक सावकारांच्या सावकारी व्यवहाराच्या कागदपत्रांची तपासणी करून अहवाल तयार केल्या जात आहे. त्या अनुषंगाने नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील परवानाधारक सावकार लक्ष्मी ज्वेलर्स आर्टचे मंगेश मधुकरराव डिभे यांचे घरी (दि.28)धाड टाकण्यात आली. यादरम्यान त्यांनी वर्ष 2023 ते 2025 या कालावधी मध्ये सावकारी परवण्याचे नूतनीकरणच केले नसल्याचे दिसून आले. वास्तविक मंगेश डीभे यांना परवाना नूतनीकरण करण्या संदर्भात पोस्टाने नोटीस देण्यात आली होती.सावकार मंगेश डिभे यांना नोटीस मिळाल्यानंतरही परवाना नूतनीकरण संदर्भात कुठलीच हालचाल केली नाही. त्यामुळे त्यांच्या गजानन लक्ष्मी ज्वेलर्स आर्ट येथे तपासणी करण्यात आली. परवानाधारक सावकाराने दुकान विक्री करून बाहेर गावी निघून जाण्याची तयारी केली होती. ही माहिती प्राप्त होताच सहायक निबंधक यांनी तपासणी पथक मंगेश डिभे यांच्या घरी

पाठवले. आणि त्यांच्या घराची झडती घेतली.सहायक निबंधक सचिन पतंगे, सुधीर मानकर, आशिष भोंडे, चेतना कुचे, ज्ञानेश्वर हेडाऊ, अभय महाजन, किशोर आढाव, जया मोरकर यांच्या टीमने मंगेश डिभे यांच्या राहते घरी श्री संत जगनाडे नगर येथे धाड टाकली. जवळपास 5 तास कारवाई करण्यात आली.डिभे यांच्या घरून सावकारी व्यवहारासंबंधी एकूण 44 दस्तावेज आढळून आले. त्या मध्ये गहाण ठेव पावती बुक, गहाण सोड पावती बुक,नोंदवही, दुकानाच्या नावाची धनादेश, बँक पासबुक, सोने-चांदी विक्रीचे पावती बुक, खतावणी नोंदवही, भांडवल खाते नोंदवही तपासणी आदि पथकाने जप्त केले. महाराष्ट्र सावकारी अधिनियम मधील तरतुदी नुसार परवानाधारक सावकार मंगेश डिभे यांना पुन्हा नोटीस देण्यात आली आणि त्यांचा परवाना रद्द करण्यासंदर्भात कारवाई सुरू करण्यात आली आहे.

भक्तिमार्ग

वादविवाद थांबवण्यासाठी

- कुटुंबातल्या माणसांचे स्वभाव, आचार-विचार पूर्णपणे वेगळे असतात. एकमेकांची मतं पटत नाहीत. सवयींचा त्रास होतो. यामुळे कुटुंबातल्या सदस्यांमध्ये भांडणं, वाद, क्लेश, कलह होत असतात. घरातलं वातावरण कलुषित होतं. सतत अशांती राहते. वास्तूशास्त्रातल्या सरळ-सोप्या उपायांनी ही समस्या दूर करता येते. घरात वादविवाद होत असतील तर काय करायला हवं याविषयी...
- घरातल्या सदस्यांनी एकत्र बसून जेवण केलं पाहिजे. दिवसातून एक वेळ तरी सर्वांनी एकत्र जेवण घ्यायला हवं. जेवणासाठी स्वयंपाकघरात बसा. यामुळे राहूचा प्रभाव कमी होऊन घरात शांतता टिकून राहते.
- घरातल्या महिलांचं एकमेकांसोबत पटत नसेल तर त्यांनी एकाच वेळी लाल कपडे घालू नयेत.
- घरातल्या अशांतीला एखादी महिला जबाबदार असेल तर पांढऱ्या मोत्याची अंगठी तयार करून उजव्या हाताच्या करंगळीच्या शेजारच्या बोटात घातली पाहिजे.
- चंदनापासून तयार केलेली देवाची मूर्ती घरात ठेवा. ही मूर्ती प्रत्येकाचं लक्ष जाईल अशा ठिकाणी ठेवा. यामुळे ताणतणाव कमी होऊन एकमेकांमध्ये विश्वास निर्माण होऊ शकेल.
- विनाकारण वाद होत असतील तर घरातल्या पुरुषांनी गुरुवारी दाढी करू नये. तसंच केसही कापू नयेत.
- सकाळी आंघोळ केल्यानंतर घरात गंगाजल शिंपडा.
- कचराकुंडी घराच्या उत्तर-पूर्व दिशेला असू नये. यामुळे कुटुंबातल्या सदस्यांमध्ये एकमेकांविषयी कटूता निर्माण होऊ शकते.

वास्तू भक्ती

नवसंवत्सराचं स्वागत असो

साडेतीन मुहुर्तांपैकी एक असलेल्या गुढी पाडव्यापासून नवीन संवत्सराला सुरुवात होते. या सणाशी अनेक कथा संबंधित आहेत. सध्याच्या असुरक्षित आणि जीवघेण्या स्पर्धेच्या जमान्यात सण तसेच उत्सवांमधून मिळणारा आनंद मोलाचा आहे. पण तो घेतानाच प्रत्येकाने सन्मार्गाने वागण्याचा संकल्प करायला हवा. इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करता आला तरच खऱ्या अर्थाने सण साजरे झाले असे म्हणता येतील.

गुढी पाडवा... वर्षारंभाचा एक मंगल दिवस... कालगणनेचं सूत्र गवसलं तेव्हापासून पळ, प्रहर, दिवस, मास, वर्ष अशी गणना सुरू झाली आणि वेगवेगळ्या संस्कृतींनी वेगवेगळ्या परिमाणांनिशी ती अंगिकारली. इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे एक जानेवारी रोजी नववर्षाचा प्रारंभ केला जातो. भारतात महाराष्ट्र आणि अन्य काही राज्यांमध्ये चैत्र शुक्ल प्रतिपदा म्हणजे गुढी पाडव्याच्या दिवशी नववर्षारंभ होतो. हा सण गुढी पाडवा म्हणून ओळखला जातो. या सणाचे वैशिष्ट्य म्हणजे तो वसंताचे स्वागत करण्यासाठी येतो. क्रांतीवृत्त आणि विषुववृत्त एकमेकांना छेदतात त्या छेदनबिंदूला वसंत संपात बिंदू आणि शरद संपात बिंदू असे म्हणतात. सूर्य २१ मार्च रोजी विषुववृत्तावर वसंत संपात बिंदूपाशी येतो. त्या दिवशी पृथ्वीवर सर्वत्र दिनमान आणि रात्रीमान समान असते. याच सुमारास चैत्र महिन्याचा प्रारंभ होतो. चैत्र शुक्ल प्रतिपदेला आपण सकाळी लवकर उठून घराची स्वच्छता करतो. अंगाला सुवासिक तेल लावून अभ्यंगस्नान करतो. दरवाजाजवळ रांगोळी काढली जाते, नवी वस्त्रे परिधान करून देवाची पूजा केली जाते. घराच्या दरवाज्याला आंब्याच्या पानांचं तोरणं बांधलं जातं. लांबसडक काठी घेऊन, स्वच्छ धुवून, टोकाला तांबडे वस्त्र आणि फुलांची माळ, साखरगाठी घालून त्यावर कलश ठेवला जातो. अशा रितीने तयार केलेली गुढी दरवाजासमोरील रांगोळीवर उभी केली जाते. त्याला ब्रह्मध्वज असे म्हणतात. या ब्रह्मध्वजाची विधिवत पूजा केली जाते. त्यानंतर कडुनिंबाची कोवळी पाने घेऊन त्यात जिरे, मिरे, हिंग, सैंधव, मीठ आणि ओवा घालून मिश्रण वाटून घेतात. हे मिश्रण थोडे थोडे घ्यायचे असते. वर्षारंभी हे मिश्रण खाल्ल्याने वर्षभर आरोग्य चांगले राहते असा समज दृढ आहे. पण कडुनिंबाचे जास्त सेवनही अपायकारक आहे हे लक्षात घ्यायला हवे. पंचपक्वानांचे भोजन करून हा दिवस आनंदात घालवला जातो. आधुनिक काळातही भारतीय शालीवाहन शकवर्षाचा पहिला दिवस युगाब्धाचा पहिला दिवस समजला जातो. त्यादृष्टीनेही पाडव्याचे महत्त्व मोठे आहे.

गुढी पाडव्याच्या दिवशी कडुनिंबाचे महत्त्व मोठे. कडुनिंब ही औषधी वनस्पती. त्यामुळे गुढी पाडव्याच्या निमित्ताने गावागावांमध्ये कडुनिंबाची लागवड केली जायला हवी. खरे तर कडुनिंबाचे विविध गुणधर्म लक्षात घेता तो कल्पवृक्ष आहे असेच म्हणावे लागेल. या 'आर्यविषक' प्राचीन ग्रंथात कडुनिंबाला सर्वरोगपरिहारक म्हटले आहे. यापासून अंगाचा साबण, कीटकनाशके, धूप, हेअर टॉनिक, टुथपेस्ट इत्यादी उत्पादने तयार केली जातात. अलीकडे रासायनिक कीटकनाशकांचे दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे कडुनिंबापासून तयार केलेली कीटकनाशके उपयुक्त ठरू लागली आहेत. पर्यावरणाच्या दृष्टीनेही कडुनिंबाची झाडे गावागावात असणे गरजेचे आहे. मुख्य म्हणजे या झाडांना पाणी कमी लागते. खडकाळ माळरानावर तसेच डोंगराळ भागातही कडुनिंबाची झाडे चांगली वाढतात. याच्या बियांमध्ये ४० टक्के तेल अणि गंधाचा अंश असतो. भूक न लागणे, उलट्या, आम्लपित्त, काविळ, मूळव्याध, पोटातील जंत, केसांमधील उवा या शिवाय त्वचारोग, व्रण, जखमा, विंचूदंश, सर्पदंश, मुखरोग, दातांचे आजार, स्त्रियांचे आजार तसेच सांधेदुखीवर कडुनिंब हे प्रभावी औषध असल्याचे दिसून आले आहे. मात्र, याचा वापर डॉक्टरांच्या सल्ल्यानेच करायला हवा.

गुढी पाडव्याच्या सुमुहूर्तावर वाईट सवयींचा त्याग करून नवीन गोष्टींचा अंमल केला जातो आणि त्या प्रमाणे कृती करण्यास प्रारंभ होतो. वाईट प्रवृत्ती दूर टाकून चांगले काम करण्याचा संकल्प या दिवशी केला जातो. गुढी पाडव्याच्या निमित्ताने काही ठिकाणी शोभायात्रा काढण्यात येतात. यात समाजशिक्षण आणि समाज प्रबोधनासाठी विविध चित्ररथही असतात. नवी वस्त्रे घालून लहान-थोर, रंक-राव, स्त्री-पुरुष एकत्र येऊन आनंदाने या शोभायात्रांमध्ये सामील होतात. मात्र, या शोभायात्रांचा उद्देश सर्वांनी एकत्र येण्याचा आणि समाज प्रबोधनाचाच असायला हवा.

आरंभ विशेष

त्यातून सामाजिक स्वच्छतेची जाणीव निर्माण व्हायला हवी. अंधश्रध्दा निर्मूलन, भ्रष्टाचार निर्मूलन, महिलांची सुरक्षितता, बाल संगोपन या प्रश्नांबाबत समाज प्रबोधनावर भर दिला जायला हवा. असे झाले तरच त्यांचा उद्देश खऱ्या अर्थाने सफल होऊ शकेल.

गुढी पाडव्याच्या सणाविषयी अनेक प्रकारे उत्पत्ती सांगण्यात येतात. ब्रह्मदेवाने या दिवशी विश्वाची निर्मिती केली असे सांगण्यात येते. याच दिवशी शालिवाहन राजाने शकाचा पराभव करून जनतेची त्रासातून सुटका केली. म्हणून या दिवसापासून शकाचा प्रारंभ करण्यात आला. ज्याने पराभव केला तो शालीवाहन आणि ज्यांचा पराभव झाला ते शक. या दोघांचाही उल्लेख म्हणून 'शालीवाहन शक' असा शब्दप्रयोग वापरला जाऊ लागला. भगवान विष्णुंनी प्रभू रामचंद्रांचे रूप घेऊन दुष्ट रावणाचा पराभव केला. विजयश्री मिळवणाऱ्या प्रभू श्री रामचंद्रांनी अयोध्येत प्रवेश मिळवला तो दिवस म्हणजे चैत्र शुक्ल प्रतिपदा. या दिवशी जनतेने प्रभू रामचंद्रांचे गुढ्या, तोरणे उभारून स्वागत केले. म्हणून या दिवशी सर्वत्र गुढ्या-तोरणे उभारून आनंदोत्सव साजरा केला जातो. अशी या महत्त्वाची सणाची परंपरा वर्षानुवर्षे त्याच उत्साहाने आणि श्रध्देने पाळली जात आहे.

सध्या प्रत्येकाचे जीवन असुरक्षित झाले आहे. सर्वत्र जीवघेणी स्पर्धा जाणवत असते. तसेच महागाईनेही कहर केला आहे. मंदिरात देवाचे मार्केटिंग चालले आहे. अशा वेळी प्रत्येकाने स्वत:ला समजून घेऊन सन्मार्गाचा अवलंब करायला हवा. ईश्वरपूजा केल्याने ईश्वरात बदल होत नसतो तर तो पूजा करणाऱ्यांमध्ये होत असतो. तसा बदल झाला नाही तर पूजा करण्याचा उद्देशच सफल होणार नाही. आपले सण-उत्सव मनाला आनंद प्राप्त करून देतात तसेच ते ऋतूवरही आधारित आहेत. त्यामुळे सणादिवशी घेतलेला आहार किंवा पक्वान्न शरीराचे आरोग्य सांभाळतात. मनाचे आणि शरीराचे आरोग्य चांगले रहावे म्हणून सण-उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे करायला हवेत. पण सण साजरे करताना दुसऱ्याला त्रास होणार नाही याचीही काळजी घ्यायला हवी. इतरांना मदत करून त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करायला हवा. स्वत: आनंदाने जगणे आणि इतरांच्या जीवनात आनंद निर्माण करणे हाच सणांचा तसेच उत्सवांचा खरा अर्थ आहे. सुख वाटले तर वाढते आणि दु:ख वाटले तर कमी होते. म्हणून सणाच्या निमित्ताने साऱ्यांनी एकत्र येणे गरजेचे आहे. आजच्या विभक्त कुटुंबपध्दतीत सणांच्या तसेच उत्सवांच्या निमित्ताने तरी सारेजण एकत्र येतात आणि आनंद साजरा करतात. यालाच गुढी पाडव्याचा खरा आनंद म्हणता येईल. या दिवशी चांगल्या कामाचा प्रारंभ करावा. नव्या वस्तूंची खरेदी करावी. सुमुहूर्त असल्याने कोणत्याही चांगल्या कामाची मुहूर्तमेढ रोवण्यास हा दिवस योग्य आहे.

आनंद दडलाय मनात

या जगात आलेल्या प्रत्येक माणसाने सतत कर्म करत रहायला हवं. क्रियाशील राहून प्रत्येक क्षणाचा पुरेपूर आनंद घ्यायला हवा. आपल्या आयुष्यातलं प्रत्येक सुख आणि दु:ख अंतर्मनाशी निगडित असतं. विविध विकारांच्या चक्रात आपण अडकतो. हे विकार आपल्याला जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करत असतात पण स्वत:वर नियंत्रण मिळवणाऱ्या व्यक्तीला कशाचीही भीती उरत नाही. तसंच त्याच्या मनात विकारही उत्पन्न होत नाहीत. स्वत:मध्येच सुख दडलंय असं शास्त्रांमध्ये नमूद करण्यात आलंय. माणसाला आयुष्यात काही प्राप्त करायचं असेल तर ते आपल्या आत शोधलं पाहिजे. आत्मनिर्माणातून मनुष्य जिवंतपणी मोक्ष आणि परमानंदाची प्राप्ती करू शकतो. काम, क्रोध, मोहासारखे नकारात्मक विकार दूर ठेवल्याने आपलं आयुष्य स्वर्गासारखं बनू शकतं. सगळे आनंद आपण उपभोगू शकतो. भौतिक वस्तूंमधून माणसाला कोणताही आनंद प्राप्त होत नाही. त्याचं मन दुसऱ्या वस्तूंकडे, इतर सुखांकडे आकर्षित होत असतं. एक इच्छा पूर्ण झाली की मनात दुसरी इच्छा घर करते. इच्छांची ही मालिका संपत नाही.

धन, संपत्ती, पद, प्रतिष्ठा सगळं मिळवूनही माणसाच्या आत रिकामपण भरून राहिलेलं असतं. याबाबत एक उदाहरण सांगता येईल. एक माणूस यशस्वी उद्योजक बनला. आपल्या क्षेत्रात तो यशाच्या शिखरावर जाऊन पोहोचला. त्यावेळी त्याला एक प्रश्न विचारण्यात आला. व्यवसाय सुरू करताना तुम्हाला कोणता सल्ला अपेक्षित होता? यावर तो म्हणाला, शिखरावर पोहोचल्यानंतरही आपल्या हाती काहीही रहात नाही, याची जाणीव मला कुणी तरी करून द्यायला हवी होती. माणूस एखाद्या लक्ष्याचा पाठलाग करतो. ते लक्ष्य प्राप्त करण्यासाठी जंग जंग पछाडतो. पण यात काहीही अर्थ नव्हता याची जाणीव त्याला एका क्षणी होते.

आपलं शरीर पाच तत्त्वांनी बनलंय. जल, वायू, अग्नी, पृथ्वी आणि आकाश अशी ही पाच तत्त्वं होत. मनुष्याचा जन्म या तत्त्वांनी झालाय आणि अंती याच तत्त्वांमध्ये त्याला मिसळून जायचंय, असं गीतेत नमूद करण्यात आलंय. मुक्ती हवी असेल तर आपली सगळी कर्मं परमेश्वरचरणी अर्पण केली पाहिजेत. मोक्षप्राप्तीचा हा अत्यंत साधा आणि सरळ मार्ग आहे. आपण चिंता करत बसू नये. कुणालाही घाबरू नये. आपल्याला कुणीही मारू शकत नाही. या जगात जे घडतंय ते चांगलंच आहे. आजवर जे झालं ते चांगलंच झालं. यापुढे जे होईल तेही चांगलंच असेल, असा विचार कायम मनात ठेवा. आपल्यापैकी प्रत्येकाने वर्तमानात जगलं पाहिजे. मागे सुटलं त्याबद्दल रडत बसू नका. जे झालं ते झालं. आपण येताना काहीही घेऊन आलो नाही. तसंच सोबत काही घेऊन जाणार नाही. आपण काहीही निर्माण केलं नाही. त्यामुळे कोणत्याही गोष्टीचा वृथा अभिमान बाळगू नका.

भक्ती आणि बोध

पूजनात का असतं केळं?

हिंदू धर्मातल्या प्रत्येक पूजेत केळ्याला महत्त्वाचं स्थान दिलं जातं. पूजा सत्यनारायणाची असो वा दिवाळीतली, पूजन साहित्यात केळ्याचा समावेश असतोच. सत्यनारायणाचा प्रसाद मानलं जात असल्याने केळं कधीही खराब होत नाही, असं म्हणतात. अर्थात हे पुराणात नमूद करण्यात आलंय. पण यापेक्षा वेगळा विचार कधी केलाय का? म्हणूनच केळ्याला पूजनात महत्त्वाचं स्थान का बरं दिलं गेलं असावं, हे जाणून घेणं उत्सुकतेचं ठरू शकतं. केळ्याच्या झाडात देवगुरू ब्रृहस्पतीचा वास असतो असं म्हणतात. सलग सात गुरूवार केळ्याची पूजा केल्याने सगळ्या मनोकामना पूर्ण होतात, असं शास्त्रांमध्ये नमूद करण्यात आलंय.

जाणून घ्या

केळ्याच्या वृक्षात गुरू बृहस्पतींसोबतच श्रीविष्णूंचाही वास असतो, असं मानलं जातं. म्हणूनच केळ्याची पूजा गुरूवारी केली जाते. श्रद्धा आणि भक्तीभावाने केळ्याच्या झाडाची पूजा केली तर श्रीविष्णू प्रसन्न होतो, अशी श्रद्धा आहे. केळं सौभाग्य आणि सुखाचं प्रतिक मानलं जातं. केळ्याच्या पूजनाने गुरूसंबंधीचे दोष दूर होतात. घरात केळ्याची पूजा केल्याने चांगले लाभ होतात. असं असलं तरी घरात केळ्याचं रोपटं असू नये. घरात केळ्याचं रोपटं आणल्यास घरच्या प्रमुखाच्या प्रगतीत बाधा येतात, असं म्हटलं जातं. केळ्याचं झाड अंगणात लावायला हवं. झाडाची पूजा पारंपरिक पद्धतीने केली गेली पाहिजे.

केळ्याच्या पूजनाची ठराविक पद्धत आहे. त्यानुसार ब्राह्म मुहुर्तावर उठून मौनव्रताचं पालन करा. लवकर स्नान करून घ्या. केळ्याच्या झाडाला नमस्कार करून जल अर्पण करा. त्यानंतर हळद कुंकू वहा. चणा डाळ आणि गुळ अर्पण करा. अक्षता, फुलं वहा. प्रदक्षिणा घाला. घराबाहेरच्या केळ्याच्या झाडाची या पद्धतीने पूजा केली पाहिजे. या पूजनामुळे विष्णू प्रसन्न होतो आणि इच्छित फळाची प्राप्ती होते, असं म्हणतात.

सल्ला शुक्राचार्यांचा

शुक्राचार्य हे दैत्यांचे गुरू. ते विद्वान होतेच शिवाय खूप चलाखही होते. त्यांच्या शिकवणीला शुक्रनीती असं म्हटलं जातं. ही शिकवण आजही उपयुक्त ठरू शकते. आपल्याबाबतच्या काही गोष्टी इतरांपुढे उघड करू नयेत, असं शुक्राचार्य सांगतात. या गोष्टी उघड केल्याने आपलं नुकसान होऊ शकतं. याबाबत जाणून घेऊ...



धर्मशास्त्रातून...

* तुम्ही माणूस म्हणून खूप चांगले आहात. अनेक लोक तुमचा आदर करतात. तुमच्यावर प्रेम करतात. ही बाब चांगली म्हटली पाहिजे. पण याबाबत इतरांना काहीही सांगू नका. यामुळे इतरांच्या नजरेत तुमचा आदर कमी होईल.
* तुमचा अपमान झाला असेल तर त्याची जाहीर वाच्यता करू नका. हा अपमान स्वत:च्या मनातच दडपून टाका. अपमानाची वाच्यता केल्यास इतरांच्या आयुष्यातली तुमची किंमत कमी होईल.
* देवाची आराधना करताना विशेष मंत्र म्हणत असाल तर त्याबाबत जाहीरपणे काहीही सांगू नका. साधनेची जाहीर वाच्यता केल्यास तुमच्या इच्छा पूर्ण होणार नाहीत.
* तुमच्या उत्पन्नाबाबत किंवा तुमच्याकडे असलेल्या धनाबाबत कुठेही वाच्यता करू नका. यामुळे इतरांच्या मनात तुमच्याबद्दल ईर्ष्या उत्पन्न होईल तसंच तुमच्या जीवितालाही धोका निर्माण होऊ शकतो.
* वय आणि शारीरिक क्षमतेचा कोणताही संबंध नसतो. तुमचं वय कुणापुढेही उघड करू नका. कुणी विचारलं तरच वयाबाबत महिती द्या.
* आयुष्यातल्या वाईट काळातून जात असाल, काही गृहदोष असतील तर त्याबाबत वाच्यता करू नका. या समस्यांवर उपाय सापडणार नाहीत.
* तुमच्या तब्बेतीबाबत डॉक्टरांना सगळं माहिती असतं. त्यामुळे कोणत्या डॉक्टरांचा सल्ला घेताय याबाबत कुणाला काहीही सांगू नका.
* आपल्या प्रेमाबाबत, जोडीदारासोबतच्या नाजूक क्षणांबाबत कुणाला काही सांगू नका.
* आपण दिलेल्या दानाबद्दल कुणालाही सांगू नये. दान गुप्त असावं. उजव्या हाताने दिलेलं दान डाव्या हातालाही कळू नये, असं म्हणतात.

धर्मशास्त्रातून...

मंदिरं हनुमंताची

अयोध्या हे श्रीरामाचं जन्मस्थान तर लखनऊ ही उत्तर प्रदेशची राजधानी. लखनऊ ते अयोध्या हे अंतर १३५ किलोमीटर आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २७ वरून जायचं असेल तर लखनऊहून अयोध्येला अवघ्या दोन-अडीच तासात पोहोचता येतं. अर्थात या दोन शहरांचा उल्लेख करण्याचं कारण म्हणजे इथली हनुमानाची मंदिरं. या दोन शहरांमधल्या हनुमान मंदिरांच्या निर्मितीत आणि जीर्णोद्धारात मुस्लीम शासकांचा सहभाग आहे. म्हणूनच हनुमानाची ही दोन्ही मंदिरं अनोखी मानली जातात. या मंदिरांमध्ये हिंदूधर्मीय हनुमानापुढे नतमस्तक होतात. तर मुस्लीमधर्मीय येथे नमाज अदा करतात. अयोध्येतले हनुमान गढी मंदिर प्राचीन मानलं जातं. हे मंदिर हिंदू-मुस्लीम एकतेचं प्रतिक मानलं जातं. शरयू नदीच्या तीरावर हे मंदिर वसलंय. हे मंदिर बरंच जुनं आहे. जवळपास ३०० वर्षांपूर्वी या मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला होता. अयोध्येचा तत्कालीन शासक मन्सूर अलीने या मंदिराचा जीर्णोद्धार केला. याबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. मन्सूर अलीच्या एकुलत्या एका मुलाची तब्बेत बिघडली. त्यावेळी एका झाडाखाल्या हनुमान मंदिरात त्याने प्रार्थना केली. हनुमानाच्या कृपेमुळे मुलगा ठणठणीत झाला. त्यानंतर मन्सूर अलीने या ठिकाणी भव्य मंदिराची निर्मिती केली. लखनऊमधल्या अलीगंज परिसरातही हनुमानाचं असंच एक मंदिर आहे. जवळपास २०० वर्षांपूर्वी मोहंमद अली शाहने या मंदिराची निर्मिती केली. यामागेही एक कथा आहे. मोहंमद अली शाह हा अवधचा शासक होता. त्याला अपत्य नव्हतं. शाहच्या पत्नीला एक स्वप्न पडलं. इस्लामवाडी परिसरात हनुमानाची एक मूर्ती जमिनीखाली दडली असल्याचं तिला स्वप्नात दिसलं. दुसऱ्या दिवशी सकाळी ही मूर्ती बाहेर काढण्यात आली आणि त्या ठिकाणी हनुमानाचं मंदिर उभारण्यात आलं. यानंतर शाहला अपत्य झाल्याचं बोललं जातं.

भक्ती आणि बोध

फक्त पैसा नाही तर मान कमवा

पैशामुळे जीवनातली अनेक सुखं आपल्या दारी उभी राहतात. म्हणूनच प्रत्येकजण पैसा कमावण्याच्या मागे आहे. धन-दौलत, पद-प्रतिष्ठा हे सगळं मिळायला हवं. या जगात प्रत्येकाकडे समान संपत्ती नाही. कुणाकडे जास्त पैसा आहे. कुणाकडे गरजेपुरता पैसा आहे तर कुणाकडे अत्यंत कमी पैसा आहे. पण आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी लागेल इतका पैसा प्रत्येकाकडे असतो. अर्थात पैसा योग्य मार्गाने कमावला तर सोबत प्रतिष्ठाही मिळते. काळा पैसा असेल तर तुरुंगवास भोगावा लागतो. बदनामी तर होतेच शिवाय कमावलेला पैसा हातचा जातो. त्यामुळे कष्टाचा पैसा महत्त्वाचा मानला गेला आहे. पैशांसोबत तुमच्याकडे प्रतिष्ठाही असली पाहिजे. लोकांनी तुमचा आदर केला पाहिजे. आदराने वागलं आणि बोललं पाहिजे. धन, दौलतीमुळे मिळणारी सगळी सुखं आपण उपभोगतो पण प्रतिष्ठा आणि आदराचा आनंद उपभोगणारी माणसं खूपच कमी असतात. या जगात तुम्हाला मान मिळत असेल तर त्याचा भरपूर उपभोग घ्या.

भक्ती मार्ग

पैसा नश्वर आहे. लक्ष्मी चंचल असते असं म्हणतात. मृत्यूनंतर पैसा इथेच सोडून जायचा असतो पण मान, प्रतिष्ठा आपल्यासोबत राहते. यामुळे समाधान मिळतं. एक वेळ पैसा कमी असेल तरी चालेल पण अनादर झालेला चालणार नाही. आपल्या वर्तणुकीने मान सन्मान कमवायचा असतो. पैसा काही काळ प्रतिष्ठा मिळवून देऊ शकतो पण त्यानंतर आपली कर्मंच मोक्षाकडे घेऊन जातात. धनसंचय जरूर करावा पण गरजूंना दानही केलं पाहिजे. मान-सन्मान, प्रतिष्ठा हीच आपली खरी कमाई म्हटली पाहिजे. त्यामुळे पैसा कमावला तरी त्यासाठी योग्य मार्गाची निवड करा. यामुळे तुमच्याकडे मानमरातबही चालत येईल.

गरिबांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा पुरवाव्यात

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा युवा डॉक्टरांशी संवाद : राज्यपालांच्या उपस्थितीत एम्सचा पहिला पदवीदान समारंभ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :** एम्ससारख्या एका प्रतिष्ठित संस्थेतून पदवी पूर्ण केल्यानंतर डॉक्टर म्हणून तुमच्यावर मोठी जबाबदारी आहे. गरिबांची निःस्वार्थ रुग्णसेवा करा. उपेक्षित भागापर्यंत जास्तीत जास्त अत्याधुनिक वैद्यकीय सोयीसुविधा पोहोचविण्यावर भर द्या, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन व नितीन गडकरी यांच्या उपस्थितीत शनिवारी नागपूरच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेचा (एम्स) पहिला पदवीदान दीक्षांत समारोह पार पडला. यावेळी खा. श्यामकुमार बर्वे, खा. राजेंद्र गोपछडे, आ. संजय मेश्राम, एम्सचे अध्यक्ष डॉ. अनंत पंढरे, कार्यकारी संचालक डॉ. प्रशांत जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

गडकरी म्हणाले, विदर्भाच्या ग्रामीण भागांमधील रुग्णांना उत्तम आरोग्य सेवा देण्याचे आणि वैद्यकीय सुविधा पुरविण्याचे काम एम्सच्या माध्यमातून होत आहे. भविष्यात एम्सच्या कामाची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जावी, याद्दष्टीने प्रयत्न होतील, असा आशा आहे.ज्या सुविधा इतर रुग्णालयांमध्ये नाहीत, त्या एम्समध्ये मिळणे अपेक्षित आहे. विशेषतः उत्तर नागपूरसह पूर्व विदर्भात थॅलेसिमिया, सिकलसेलची मोठी समस्या आहे. या उत्तर नागपुरात तर हजारो रुग्ण आहेत. आता एम्समध्ये बोन मॅरो ट्रान्सप्लान्ट होत आहे, ही आनंदाची बाब आहे. त्यामुळे प्रादेशिक समस्या लक्षात घेऊन काम करणे अपेक्षित आहे, असेही गडकरी म्हणाले.

गडकरी हे भारताचे केनेडी !

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी पदवीदान समारंभानंतर डॉक्टरांचे आणि व्यवस्थापनाचे कौतुक केले. त्याचवेळी त्यांनी ना. श्री. गडकरी यांच्याविषयी गौरवोद्गार काढले. ते म्हणाले, देशाच्या विकासात चांगले रस्ते महत्त्वाची भूमिका बजावतात, असे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ केनेडी म्हणायचे. गडकरींनी देशभरात केलेले काम बघून मी त्यांना भारताचे जॉन एफ केनेडी मानतो. त्यांच्या या वाक्याला टाळ्यांचा कडकडाट झाला.

चांगला डॉक्टर चांगला माणूस असावा

वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर डॉक्टर म्हणून समाजात प्रतिष्ठा प्राप्त होते. पण चांगला माणूस चांगला डॉक्टर असणे आवश्यक आहे. चांगले काम केले की प्रगती आपोआप होते, असा सल्लाही नितीन गडकरी यांनी यावेळी दिला.

काँग्रेसच्या प्रवक्त्याविरुद्ध गुन्हा दाखल

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २९ :** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या प्रशांत कोरटकर याला तेलंगणात पळून जाण्यास मदत करणाऱ्या प्रशिक पडवेकर याच्याबाबत मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारला म्हणून काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांच्याविरुद्ध गणेशपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याची माहिती आहे.

भाजपचे आमदार प्रवीण दटके, आ. कृष्णा खोपडे आणि भाजपचे शहराध्यक्ष बंटी कुकडे यांच्या नेतृत्वात तक्रार देण्यात आली होती. शिवद्रोही प्रशांत कोरटकर याची चंद्रपुरातील आलिशान हॉटेलात मुक्कामाची व्यवस्था करण्यापासून तर तेलंगणा राज्यात पळून जाण्यात मदत करण्यापर्यंत भाजपच्या एका बड्या नेत्याच्या नागपूर कार्यालयात काम करणारा भाजप कार्यकर्ता प्रशिक पडवेकर आघाडीवर होता. कोरटकर याला तेलंगणात पळवून नेण्यात भाजप सहभागी आहे असा आरोप काँग्रेसते प्रवक्ते अतूल लोंढे यांनी केला होता मुख्यमंत्री खरेच शिवप्रेमी असाल तर खरी माहती लोकांना द्यावी, असेही ते म्हणाले होते.

त्यामुळे भारतीय जनता पक्षामध्ये खळबळ उडाली. भाजपचे आमदार प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, शहरअध्यक्ष बंटी कुकडे यांच्यासह शेकडो भाजपचे कार्यकर्ते गणेशपेठ पोलीस ठाण्यात हजर होते. त्यांनी अतुल लोंढे मुदार्बादचे नारे लावले. मुख्यमंत्र्यांची विनाकारण बदनामी करणे, दोन समाजात तेढ निर्माण करणे या कलमाखाली गुन्हे दाखल करण्याची मागणी भाजपचे बंटी कुकडे यांनी केली होती.

शिवाजी महाराजांना एका समाजापुरतेच मर्यादित करू नका

अजित पवार यांची विनंती

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २९ :** छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जाती आणि बारा बलुतेदारांना बरोबर घेऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. महाराजांनी कधीही जात, धर्मात भेदभाव केलेला नाही. त्यांचा एकंदरीत इतिहास पाहिला तर वेगवेगळ्या समाजातील, समाजाचे, धमार्चे, पंथाच्या लोकांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी महाराजांना मनापासून साथ दिलेली आहे. मात्र, काहीजण वेगळ्या पद्धतीने इतिहास लोकांच्या समोर आणण्याचा प्रयत्न करतात. कृपा करून महाराजांना एका समाजापुरतेच मर्यादित करू नका, महाराज सर्वांचे होते, असा सल्ला अजित पवार यांनी दिला आहे.

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वढू बु. येथील महाराजांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतले. या नंतर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते. अजित पवार म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे कोणत्या एका समाजाचे नव्हते तर ते हिंदवी स्वराज्याचे होते. छत्रपती संभाजी महाराज यांना देखील पुढील काळामध्ये केवळ ९ वर्षे मिळाली. मात्र त्यांनी देखील अशाच पद्धतीने काम केले. शौर्य कसे असावे याचे मूर्तीमेत उदाहरण म्हणजे संभाजी महाराज होते. आपल्यातील लोकांनी फितुरी केली आणि त्यातून जो इतिहास घडला तो सर्वांपुढे असल्याचे अजित पवार म्हणाले.

फुले-शाहू-आंबेडकरांची यांची विचारधारा जशी आहे, ज्यात सर्व जाती धमार्तील लोकांना बरोबर घेऊन आपल्याला पुढे जायचे आहे. त्याकरता सर्वांनी सहकार्य करावे, सर्वांनी साथ द्यावी, त्यातूनच राज्याचे भले होणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.

आदित्य ठाकरेंच्या बदनामीचे षडयंत्र

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २९ :** दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरे यांच्यावर न्वयाने आरोप करण्यात आल्याने राजकारण तापले असून, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी मोठा दावा केला आहे.

दिशा सालियन प्रकरणात मालवणी पोलिसांनी कालच क्लोजर रिपोर्ट दिला आहे. या प्रकरणात आदित्य ठाकरे यांना बदनाम करण्याचं राजकीय षडयंत्र सुरू आहे, मी गृहमंत्री असल्यापासून सांगत आहे, की हे एक षडयंत्र आहे, आणि हेच सत्य आहे, असं अनिल देशमुख म्हणाले.

दिशा सालियन प्रकरणात तिचे वडील सतीश सालियन यांनी मुंबई हाय कोर्टात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणात आदित्य ठाकरे यांच्यावर आरोप करण्यात येत आहेत. पोलिसांनी क्लोजर रिपोर्ट दिल्यानंतरही आदित्य ठाकरे यांना गोवण्याचा प्रकार सुरू असल्याचे देशमुख म्हणाले.

शिंदे गट कामराचा खून करणार का?

संजय राऊत यांचा सवाल

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २९ :** महाराष्ट्रात एकप्रकारे गुजराज किंवा उत्तर प्रदेश पॅटर्न राबवला जात आहे. महाराष्ट्र थोडासा वेगळा आहे असे आम्हाला वाटले होते पण देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे त्याच मार्गाने चालले आहेत. अजित पवार यांचा मार्ग मला वेगळा दिसत आहे, असे ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, अजित पवारांना हे सर्व माहिती असल्याने त्यांची भूमिका आणि भाषा वेगळी आहे. पण ते कैचीमध्ये अडकलेले दिसून येत आहे. कुणाल कामरा आणि माझे कालच बोलणं झाले. मी त्याला सांगितले की आपण कायद्याला सामोरे गेले पाहिजे. कुणाल कामरा हा अतिरेकी, देशद्राही कोण आहे तो? तो काय अल कायदाचा मेंबर आहे का? असा सवाल राऊतांनी उपस्थित केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, कुणाल कामरा हे देशातील एक कलाकार, कवी, लेखक आहेत. शिंदेंचे कुणाबरोबर फोटो आहे ते आम्ही बाहेर काढू का? कुणाल हा फुटीरतावादी आहे का? हा देश संविधानावर चालतो. कुणी जर कायदेशीर कारवाई केली असेल तर त्याला सामोरे गेले पाहिजे.

संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदे यांच्या गटातील लोकांना कुणाल कामरा जर श्सत्रू वाटत असेल तर आम्ही त्याच्याशी बोलायचे नाही का? आम्हालाही वाटते पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा हे महाराष्ट्राचे शत्रू आहेत, पण एकनाथ शिंदे आणि त्यांचे लोकं त्यांच्या पायाशी जाऊन बसतात, अशा शब्दात संजय राऊत यांनी तोफ डागली.

■ **अमरावती –** जिल्ह्यातील सावरखेड येथे खोरगडे वाडा मध्ये गुढी पाडव्याच्या पुर्वसंध्येला मॉडेल पूनम जामोदकर, सोनाली भास्कर यांचे छायाचित्रकार प्रतिक रोहणकर यांनी आकर्षक छायाचित्र टिपले.